७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शुक्रवार, दि. २४ जुलै २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : २०९ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## राहुल गांधींनी पळपुटेपणा सोडून संसदेत चर्चेला यावं

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे आव्हान, विद्यार्थी आंदोलनातून ठाकरे बंधूंचा अस्तित्व शोधण्याचा प्रयत्न

**मुंबई (दै. संध्या)**



नीट पेपर लीक प्रकरणावरून सुरू असलेल्या राजकीय संघर्षात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी आणि विरोधी पक्षांवर जोरदार टीका केली. विरोधकांनी रस्त्यावर आंदोलन करण्याऐवजी संसदेत येऊन चर्चा करावी, असे खुले आव्हान देत त्यांनी विद्यार्थ्यांच्या नावावर राजकारण करू नये, असेही म्हटले. फडणवीस म्हणाले, "राहुल गांधी यांच्यात खरोखर हिंमत असेल, लोकशाही आणि संविधानावर विश्वास असेल तर त्यांनी संसदेत चर्चा करावी. चर्चेची सर्वात महत्त्वाची जागा संसद आहे. मग चर्चेपासून पळ का काढता? कारण तुमची पोलखोल होईल, याची तुम्हाला भीती वाटते." त्यांनी पुढे काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांच्या सरकारांचा उल्लेख करत, "कर्नाटक, तेलंगणा आणि राजस्थानमध्ये काँग्रेसच्या सत्ताकाळात आठ वेळा पेपर लीक झाले. पंजाबमध्येही आम आदमी पक्षाच्या सरकारमध्ये पेपर लीकची प्रकरणे घडली. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून राजकारण करणे बंद करा," असा आरोप केला.

मुख्यमंत्री म्हणाले की, विरोधकांकडे काही प्रश्न किंवा सूचना असतील तर त्या संसदेत मांडाव्यात. "सरकारला योग्य निर्णय घेण्यासाठी मजबूर करा. मात्र विद्यार्थ्यांचा वापर करून केवळ राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न करू नका. विद्यार्थ्यांशी तुम्हाला काहीही देणेघेणे नाही, फक्त राजकारण करायचे आहे," अशी टीकाही त्यांनी केली.

फडणवीस यांनी केंद्र सरकारच्या भूमिकेचे समर्थन करत सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या प्रकरणात कठोर कारवाई सुरू केली आहे. पेपर लीक करणाऱ्यांना शिक्षा देण्यासाठी फास्ट ट्रॅक न्यायालयांची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच नीटची फेरपरीक्षा कोणत्याही अडथळ्याशिवाय पार पडली असून त्यामुळे पुढील परीक्षांचाही मार्ग मोकळा झाला आहे. ते म्हणाले, "पंतप्रधानांवर विश्वास ठेवला पाहिजे. काँग्रेसच्या काळात शिक्षणासाठी केवळ 8 हजार कोटी रुपयांचे बजेट होते. आज ते वाढून 1 लाख 39 हजार कोटी रुपयांवर पोहोचले आहे. एम्स, आयआयटीसारख्या प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांमध्ये संधींची दारे खुली झाली आहेत. हे मोदी सरकारच्या धोरणांमुळे शक्य झाले आहे."

शेवटी फडणवीस यांनी पुन्हा एकदा विरोधकांना आव्हान देत म्हटले, "राहुल गांधींसह सर्व विरोधी पक्षांनी पळपुटेपणा सोडावा आणि संसदेत चर्चेला यावे. विद्यार्थ्यांचे खरे कैवारी असाल तर हिंमत दाखवा. लोकशाहीत चर्चा रस्त्यावर होत नाही, ती संसदेत होते. विद्यार्थीहिताचे निर्णय आंदोलनातून नव्हे तर चर्चेतूनच होऊ शकतात. मोदी सरकार विद्यार्थीहिताला सर्वोच्च प्राधान्य देत आहे." विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ठाकरे बंधूंनी आंदोलनाला पाठिंबा जाहीर केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. ठाकरे बंधू विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या माध्यमातून आपल्या पक्षाचे राजकीय अस्तित्व शोधण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप त्यांनी केला. त्याचबरोबर मुंबई पोलिसांच्या व्हायरल व्हिडिओची दखल घेत संबंधित पोलिसावर तातडीने कारवाई करण्यात आल्याचे आणि संपूर्ण प्रकरणाची चौकशी सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## भारताने झिम्बाब्वेला ७ गडी राखून हरवले; श्रेयसच्या नेतृत्वात पहिला विजय



**मुंबई (दै. संध्या)**

पहिल्या टी२० सामन्यात भारताने झिम्बाब्वेला ८ गडी राखून पराभूत करून मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. हरारे येथे प्रथम फलंदाजी करताना झिम्बाब्वेने २० षटकांत ७ गडी गमावून १२५ धावा केल्या. प्रत्युत्तरात, भारताने ३ गडी गमावून १३.२ व्या षटकातच लक्ष्य गाठले. वैभव सूर्यवंशीने वयाच्या १५ वर्षे आणि ११८ दिवसांत अर्धशतक झळकावून इतिहास रचला. त्याने टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यात अर्धशतक झळकावणारा जगातील सर्वात तरुण फलंदाज होण्याचा मान मिळवला आणि जिब्राल्टरच्या लुईस ब्रूसचा विक्रम मोडला, ज्याने वयाच्या १६ वर्षे आणि ५६ दिवसांत हा पराक्रम केला होता. श्रेयस अय्यरच्या कर्णधारपदाखाली भारताचा हा पहिलाच विजय होता. यापूर्वी, त्यांना आयर्लंड मालिका २-० आणि इंग्लंड मालिका ४-० ने गमवावी लागली होती. वेस्ली माधेवेरेने सर्वाधिक ३९ धावा केल्या. अखेरीस, तदिवानाशे मरुमणीने नाबाद २७ धावा जोडून संघाला १०० धावांच्या पुढे नेले. भारतासाठी मयंक यादव आणि प्रिन्स यादव यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. मयंकने डावाच्या पहिल्याच चेंडूवर ब्रायन बेनेटला आणि त्यानंतर डायोन मायर्सला बाद केले. शिवम दुबे आणि रवी बिश्नोई यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

e-paper www.sandhyaepaper.com

## शिक्षण व्यवस्था उद्ध्वस्त करण्यास मोदी जबाबदार : राहुल गांधी

**नवी दिल्ली (दै. संध्या)**



जंतर-मंतरवर सुरू असलेल्या पेपरफुटी प्रकरणावरील आंदोलनादरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी X वर पोस्ट करून लिहिले की, पेपरफुटीच्या दोषींना शिक्षा देण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्ट्स स्थापन केले जातील. देशातील तरुणांचे हित आणि त्यांचे भविष्य ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. तरुणांच्या भविष्याशी खेळणाऱ्यांना सोडले जाणार नाही. यावर राहुल गांधींनी X वर पोस्ट करून म्हटले की, तुम्हीच तरुणांच्या भविष्याचे सर्वाधिक नुकसान केले आहे. तुम्ही शिक्षण व्यवस्था उद्ध्वस्त होऊ दिली आणि यासाठी जबाबदार असलेल्या व्यक्तींना संरक्षण दिले. दिल्लीतील जंतर-मंतरवर 20 जूनपासून कॉकरोच जनता पार्टी NEET पेपरफुटीनंतर शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहे. 21 जुलै रोजी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह अनेक विरोधी पक्षनेते दिल्लीतील पंतप्रधान निवासस्थानाबाहेर धरणे धरून बसले होते. देशात आतापर्यंत पेपरफुटीच्या प्रकरणांसाठी स्वतंत्र जलदगती न्यायालये नव्हती. अशा प्रकरणांची सुनावणी सामान्य न्यायालयांमध्ये होत असे, त्यामुळे निकाल येण्यासाठी अनेकदा अनेक वर्षे लागत असत. आता पंतप्रधानांनी पेपरफुटीच्या प्रकरणांसाठी जलदगती न्यायालये स्थापन करण्याची घोषणा केली आहे, जेणेकरून त्यांची सुनावणी आणि निकाल लवकर लागू शकेल. जलदगती न्यायालयांची कामगिरीही चांगली राहिली आहे. केंद्र सरकारच्या मते, बलात्कार आणि POCSO प्रकरणांसाठी स्थापन केलेल्या जलदगती न्यायालयांनी 2019 ते 2025 या काळात 3.06 लाखांहून अधिक प्रकरणांचा निपटारा केला आहे. या न्यायालयांचा निपटारा दर 96.28% आहे, म्हणजेच जेवढी नवीन प्रकरणे आली, तेवढ्याच प्रकरणांचा जवळपास निपटाराही झाला. तथापि, नवीन प्रकरणे सातत्याने दाखल होत असल्यामुळे 2025 च्या अखेरपर्यंत 2.45 लाखांहून अधिक प्रकरणे प्रलंबित होती,

## दिल्लीतील लाठीमार विरोधात पुण्यात विद्यार्थ्यांचा एल्गार

### धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची जोरदार मागणी

**पुणे (दै. संध्या)**



'पेपर लीक की ये सरकार, नहीं चलेगी अबकी बार' अशी गर्जना करत दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीमाराच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीसह विविध राजकीय पक्ष, सामाजिक, विद्यार्थी आणि कामगार संघटनांतर्फे गुरुवारी (ता. २३) भिडे वाडा ते पुणे स्टेशनपर्यंत पायी मोर्चा काढण्यात आला. या वेळी विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी सुरू असलेला खेळ थांबवून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी या वेळी करण्यात आली. यावेळी दिल्लीतील जंतर मंतर येथे न्याय मागणाऱ्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेल्या लाठीमाराचा तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला. पेपरफुटीमुळे नैराश्यातून आत्महत्या केलेल्या देशभरातील विद्यार्थ्यांना या मोर्चामध्ये श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर शिष्टमंडळाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या वेळी 'नरेंद्र-धर्मेंद्र राजीनामा द्या', 'दिल्ली पोलिस मुर्दाबाद, दिल्ली पोलिस होश में आओ', 'तानाशाही नहीं चलेगी', 'इन्कलाब जिंदाबाद, छात्र एकजूट जिंदाबाद... पेपर लीक से आजादी...' अशा गगनभेदी घोषणांनी पुण्याचे रस्ते दणाणून गेले.

भारतातील मुलींची पहिली शाळा असलेल्या ऐतिहासिक भिडे वाड्यापासून या मोर्चाला सुरुवात झाली. लालमहाल, फडके हौद, दारुवाला पूल, १५ ऑगस्ट चौक, नरपतगिरी चौक, जुनी जिल्हा परिषद मार्गे जाऊन पुणे स्टेशन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ या मोर्चाची सांगता झाली.

या प्रसंगी ज्येष्ठ नेते वसंत साळवे, डॉ. अनिल जाधव, ॲड. अरविंद तायडे, नागेश भोसले, अनिस अहमद, आदी उपस्थित होते.

> "आम्ही रात्रंदिवस एक करून परीक्षांची तयारी करतो आणि एक पेपरफुटी आमचं अख्खं आयुष्य उद्ध्वस्त करते. जोवर या सिस्टीममध्ये पारदर्शकता येत नाही आणि दोषींवर कठोर कारवाई होत नाही, तोवर आमचा लढा सुरूच राहील."
> **- गणेश जाधव, विद्यार्थी**
>
> "दिल्लीत शांततेने आंदोलन करणाऱ्या आमच्या विद्यार्थी मित्रांवर लाठीचार्ज होतो, हे लोकशाहीसाठी मारक आहे. सरकार आमच्या भविष्याबाबत अजिबात गंभीर नाही, हेच यातून दिसून येते. आम्हाला न्याय हवा आहे."
> **- रोहित शिंदे, विद्यार्थी**

> "दिल्लीत विद्यार्थ्यांवर झालेला लाठीचार्ज आणि दडपशाहीच्या निषेधार्थ, तसेच लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांच्या आदेशानुसार पुकारण्यात आलेला पुणे बंद १०० टक्के यशस्वी झाला. पेपरफुटी ही केवळ परीक्षेची समस्या नाही, तर लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी संबंधित प्रश्न आहे. त्यामुळे धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिलाच पाहिजे."
> **- ॲड. अरविंद तायडे, शहराध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी, पुणे**
>
> "नरेंद्र मोदी यांनी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्यावा, अशी आमची आर्त मागणी आहे. विद्यार्थ्यांचे करिअर उद्ध्वस्त करण्यासाठी तेच जबाबदार आहेत. त्यांनी राजीनामा दिल्याशिवाय आम्ही मागे हटणार नाही. आज आम्ही आमची राजकीय ओळख बाजूला ठेवून फक्त पालक या नात्याने या मोर्चामध्ये सहभागी झालो आहोत."
> **- राहुल डंबाळे, पालक**

## ढिंग-टांग




### २६ जुलैला शिवाजी पार्क ते सिद्धिविनायक विद्यार्थी-पालकांचा तिरंगा मोर्चा

## नीट प्रकरणावर ठाकरे बंधूंचा एल्गार

**मुंबई (दै. संध्या)**



देशभरात गाजत असलेल्या नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरण, दिल्लीतील विद्यार्थी आंदोलन आणि आंदोलकांवरील कथित पोलिस कारवाईच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. या पार्श्वभूमीवर २६ जुलै (रविवार) रोजी शिवतीर्थ (शिवाजी पार्क) ते सिद्धिविनायक मंदिर असा विद्यार्थी, पालक आणि नागरिकांचा भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याची घोषणा दोन्ही नेत्यांनी केली.

राज ठाकरे यांनी सांगितले की, हा केवळ नीट परीक्षेचा प्रश्न राहिलेला नसून देशातील विद्यार्थ्यांच्या भविष्याचा, शिक्षण व्यवस्थेवरील विश्वासाचा आणि लोकशाही मूल्यांचा प्रश्न बनला आहे. आंदोलन शांततेत सुरू असताना आंदोलकांवर दबाव टाकण्यात आला, त्याचे पडसाद महाराष्ट्रातही उमटत आहेत, असे ते म्हणाले. राज ठाकरे म्हणाले, "नीट पेपरफुटी ही पहिली वेळ नाही. यापूर्वीही अशा घटना घडल्या आहेत. सुरुवातीला केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी होती; मात्र आता हा प्रश्न थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वापर्यंत पोहोचला आहे. आंदोलकांशी संवाद साधण्याऐवजी दडपशाहीचा मार्ग स्वीकारला जात आहे."

ते पुढे म्हणाले की, "शेतकरी आंदोलन असो, मणिपूरमधील परिस्थिती असो किंवा आता विद्यार्थ्यांचे आंदोलन – प्रत्येक ठिकाणी संवादाऐवजी संघर्षाचा मार्ग स्वीकारला गेला. सरकार कुणाचेच ऐकत नाही. हा सत्तेचा माज कशासाठी?"

राज ठाकरे यांनी सांगितले की, रविवारी सकाळी ११.३० वाजता शिवतीर्थावरून मोर्चाला सुरुवात होईल. हा मोर्चा सिद्धिविनायक मंदिरापर्यंत जाईल. "सरकारला सद्बुद्धी मिळावी, अशी प्रार्थना आम्ही सिद्धिविनायकाच्या चरणी करणार आहोत. या मोर्चात कोणत्याही पक्षाचे झेंडे नसतील. फक्त राष्ट्रध्वज असेल. विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी प्रत्येक पालकाने आणि नागरिकाने या आंदोलनात सहभागी व्हावे," असे आवाहन त्यांनी केले.

उद्धव ठाकरे यांनीही केंद्र सरकारवर आणि आंदोलन हाताळण्याच्या पद्धतीवर कठोर शब्दांत टीका केली. "हा प्रश्न केवळ NEETचा राहिलेला नाही. देशभरातील तरुणांच्या मनात असंतोष आहे. बिहारसारख्या राज्यातून लोक आपला राग व्यक्त करण्यासाठी येत आहेत. सरकारने त्यांच्या भावना समजून घेण्याऐवजी त्यांना दडपण्याचा प्रयत्न केला," असे ते म्हणाले.

आंदोलक विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीमाराचा उल्लेख करत त्यांनी म्हटले की, "विद्यार्थ्यांवर लाठ्या चालवल्या गेल्या, महिला आंदोलकांशी गैरवर्तन झाल्याचे आरोप झाले. अशा घटना लोकशाहीसाठी अत्यंत चिंताजनक आहेत. या सर्व प्रकरणांची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे."

उद्धव ठाकरे यांनी सरकारला संयम बाळगण्याचे आवाहन करत म्हटले, "लोकांच्या भावना समजून घ्या. संवाद साधा. आंदोलन आणखी भडकवण्याचा प्रयत्न करू नका. सरकारने वेळेत संवाद साधला असता तर परिस्थिती इतकी चिघळली नसती."

राज ठाकरे यांनी स्पष्ट केले की, हा मोर्चा कोणत्याही राजकीय पक्षाचा कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न आहे. "शरद पवार, देवेंद्र फडणवीस किंवा विद्यार्थ्यांच्या हितासाठी उभे राहणारा कोणताही नागरिक या मोर्चात सहभागी होऊ शकतो. येथे पक्षीय राजकारणाला स्थान नाही.

## दिल्लीतील आंदोलनाचे मुंबईत पडसाद

### पोलिसांची व्हॅन अडवणारी रिया कोण? आंदोलनावर काय म्हणाली



**कोण आहे रिया अहिर**

रिया अहीर अंधेरी पूर्वेत MIDC परिसरातील रहिवाशी आहे. रिया शिक्षण घेत असून कलाकार व व्यवसायिक देखील आहे, त्यासोबत मागील 7 वर्षापासून थेटर कलाकार म्हणून सुद्धा रिया काम करते. रिया अभिनेत्री, मॉडेल आणि एंटरप्रेन्योर (उद्योजक) आहे. ती अनेक प्रसिद्ध म्युझिक व्हिडिओंमध्ये झळकली असून, अलीकडेच आलेले तिचे 'दिलबरा' हे गाणे खूप चर्चेत राहिले होते. मनोरंजन विश्वाव्यतिरिक्त रिया 'रियासत' नावाचा स्वतःचा पर्सनलाइज्ड क्लोथिंग ब्रँड चालवते; जिथे ती स्वतः कपडे डिझाइन आणि हँडक्राफ्ट करते. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इंस्टाग्रामवर तिचे १ लाखांहून अधिक फॉलोअर्स आहेत.

**मुंबई (दै. संध्या)**

दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचे पडसाद गल्लीतही पाहायला मिळत आहेत. देशातील विविध राज्यात विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जचा विरोध पाहायला मिळत आहे, लोक रस्त्यावर उतरुन आपला विरोध व्यक्त करत आहेत. सोशल मीडियातूनही तरुणाई एकत्र येत आहे. दिल्लीतील जंतर-मंतर येथे नीट पेपर फुटी आणि शिक्षण व्यवस्थेतील गोंधळाविरोधात सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाचे तीव्र पडसाद मुंबईतही उमटल्याचं दिसून आलं. मुंबईतील आंदोलनावेळी दोन व्हिडिओ चांगलेच व्हायरल झाले. त्यामध्ये, एक मुलगी पोलिसांची व्हॅन अडवताना दिसते. तर, दुसऱ्या व्हिडिओत पोलीस एका तरुणाला धमकी देत आहे. त्यातील मुंबई गर्ल ठरलेल्या रियाने संवाद साधला आहे.

दिल्लीतील आंदोलनाच्या समर्थनार्थ आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी बुधवारी मुंबईतील विविध भागांत विद्यार्थ्यांनी रस्त्यावर उतरून जोरदार निदर्शने केली. बुधवारी चेंबूर आणि दादर परिसरात मोठ्या संख्येने विद्यार्थी एकत्र आले होते. चेंबूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ विद्यार्थ्यांनी शिक्षण व्यवस्थेत सुधारणा करण्याची मागणी करणारे पोस्टर्स हातात घेऊन आंदोलन केले. या आंदोलकांना पोलिसांनी स्थानबद्ध करून ताब्यात घेतल्याचा आरोप करण्यात आला. दुसरीकडे, विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे दादर येथील ऐतिहासिक शिवाजी पार्क येथेही मोर्चा काढून जोरदार निदर्शने केली.

दादरच्या शिवाजी पार्कजवळ पोलीस स्थानबद्ध केलेल्या आंदोलक विद्यार्थ्यांना व्हॅनमध्ये बसवून नेण्याचा प्रयत्न करत होते. त्याच वेळी हुडी आणि कॅप घातलेली तरुणी पुढे आली, तिने न घाबरता पोलिसांची व्हॅन आपल्या एका हाताने अडवली. रिया अहीर ही तरुणी मुसळधार पावसात थेट पोलिसांच्या व्हॅनसमोर उभी राहिली. रियाच्या धाडसाची आणि आंदोलनातील कणखर भूमिकेची दृश्ये कॅमेऱ्यात कैद झाली असून, एका तरुणीने एकटीने पोलीस गाडी रोखून धरल्याचा हा व्हिडिओ आणि छायाचित्रे सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहेत. नेटीझन्स तिचं कौतुक करत आहेत.

## संपादकीय

# निर्भीड पत्रकार : लोकमान्य टिळक

आकाश जरी कोसळले, तरी मी कोसळणार नाही. त्या कोसळलेल्या आभाळावर उभा राहून ध्येयाकडे वाटचाल करीन," असा विचार ज्यांनी जनमनात रुजवला ते भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील थोर पुढारी, निर्भीड पत्रकार, संपादक, विद्यार्थीप्रिय शिक्षक, प्रतिभावंत लेखक,उत्तम वक्ते म्हणजे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक. भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील सन १८९० ते १९२० हा काळ टिळक युग मानला गेल्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वमान्य जनतेवर प्रभाव पडला. टिळक हे जहालवादी असून, इंग्रजांनी भारतास स्वातंत्र्य दिलेच पाहिजे व त्यासाठी त्यांच्याशी असलेले मतभेद उघड करून सर्व जनतेने आंदोलन केले पाहिजे अशी त्यांची विचारधारा होती. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या 'निबंधमाले'पासून तसेच कलकत्ता येथील 'अमृतबझार पत्रिकेचे संपादक शिरीषबाबू घोष यांच्यापासून प्रेरणा घेऊन लोकमान्य टिळक यांनी मराठी व इंग्रजी वृत्तपत्र काढण्याचे ठरवले. दि. २ जानेवारी १८८१ रोजी 'मराठा' हे इंग्रजी व दि. ४ जानेवारी १८८१ रोजी 'केसरी' ही दोन वृत्तपत्रं प्रसिद्ध करून टिळक मराठी पत्रकारितेच्या परंपरेचे पाईक झाले. त्याकाळी ही 'केसरी'(मराठी) व 'मराठा'(इंग्रजी) हे साप्ताहिक स्वरूपात असून ते दर मंगळवारी पुणे येथून प्रसिद्ध होत असे. समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर हे १८८१ ते १८८७ या काळात केसरीचे संपादक तर टिळक हे १८८१ ते १९२० या काळात 'मराठा'चे संपादक होते."या पत्रात एरवीच्या वर्तमानपत्राप्रमाणे बातम्या, राजकीय प्रकरण, व्यापारासंबंधी माहिती वगैरे नेहमीचे विषय तर येतीलच पण या खेरीज लोकस्थितीवर निबंध, नवीन ग्रंथावर टीका, वगैरे विषयांचा त्यात समावेश केला जाईल. तसेच विलायतेत ज्या राज्यप्रकरणांची वाटाघाट होते ती इकडील लोकास समजणे अवश्य असल्यामुळे त्याचाही सारांश रूपाने यात संग्रह करण्याचा बेत केला आहे." असा मजकूर 'केसरीच्या' पहिल्या अंकात प्रसिद्ध झाला होता. या निवेदनाप्रमाणे टिळकांनी अखेरपर्यंत लेखन केले. वर्तमानपत्रकर्ते हे रयतेचे कोतवाल व वकील होत, हीच भूमिका केसरीच्या संपादकांनी अंगी बाळगली. कोल्हापूर गादीच्या प्रकरणात टिळक आणि आगरकर यांना चार महिने तुरुंगवास घडल्याने १८८४ पासून त्यांच्यातील मतभेद विकोपाला गेले आणि दि.२५ ऑक्टोबर १८८७ च्या केसरीच्या अंकात आगरकर यांचा केसरीचा संबंध नसल्याचे जाहीर केले.'केसरी' या वृत्तपत्राचा इतिहास हा केवळ एका वृत्तपत्राचा इतिहास नसून,तो जणू स्वातंत्र्यचळवळीचा इतिहास आहे. केसरी या वृत्तपत्राला टिळकांनी जहाल राष्ट्रवादी चळवळीचे मुखपत्र म्हणून एक वेगळा आकार दिला. टिळकांची लेखणी ही निर्भीड व धारदार असून, इंग्रजांविरुद्ध राजकीय प्रबोधांचे एक शस्त्र म्हणून त्यांनी केसरीतून आपली लेखणी चालवली. त्यांची पत्रकारिता ही जणू त्यांच्या राजकीय नेतृत्वाचा एक भाग होती. याची एक आठवण म्हणजे, दि.१५ जून १८९७ रोजी केसरीत 'शिवाजीचे उद्गार' ही कविता प्रसिद्ध झाल्यामुळे टिळकांना राजद्रोहाच्या आरोपाखाली सुमारे दीड वर्ष कारावासाची शिक्षा झाली. त्यावेळी साहित्यसम्राट न. चिं. केळकर हे केसरीचे संपादक होते. वास्तविक ती कविता नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी लिहिली असली, तरी त्या लेखनाची जबाबदारी ही टिळकांनी स्वत:कडे घेतली व दि.२४ जून १९०८ रोजी टिळकांना राजद्रोहाच्या आरोपाखाली सहा वर्षांची शिक्षा होऊन त्यांना मंडालेच्या तुरुंगात पाठवले. टिळकांच्या अग्रलेखांचे मथळे हे जणू वाचकांना चक्रवून सोडत असत.'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का'?,'राज्य करणे म्हणजे सूड उगवणे नव्हे','उजाडले पण सूर्य कोठे'?, 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ','गोळी घाला की फाशी द्या','उत्तम गुराखी कोण'? हे त्यांच्या अग्रलेखांचे मथळे केवळ शोभेचे नसून, त्याकाळी ब्रिटिश राज्यकर्त्यांची रेवडी उडवताना सामान्य वाचकांना त्याद्वारे बोध मिळत असे. 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का?' या त्यांच्या गाजलेल्या अग्रलेखाची सुरुवात करताना टिळक लिहितात, "हा प्रश्न पाहून आमचे कित्येक वाचक केसरीकारांचे डोके ठिकाणावर आहे का? असा प्रश्न करतील, आम्ही काय म्हणत आहोत ते नीट ऐकून घेण्याबद्दल त्यास प्रथम विनंती करून नंतर विषयाकडे वळतो' अशा मार्मिक भाषेत ते लेखन करत असत.

## संस्कृत सुभाषित

सुभाषित – व्यसनानन्तरं सौख्यं स्वल्पमप्याधिकं
भवेत्। कषायरसमाद्याय स्वाद्वुतीवाम्बु विद्यते ॥

अर्थ : संकटे येऊन गेल्यानंतर जे थोडेफार सुख मिळते, ते खूपच अधिक वाटते. प्रथम आवळ्याची चव तुरट भासते पण त्यावर पाणी प्याल्यावर ते मात्र गोड लागते.

## सुविचार

माणसाचे प्रेम हे धरती सारखे असते अगोदर एक दाणा पेरावा लागतो.

## गुरु वचन

### कर्मयोगासाठी कौशल्य असणे आवश्यक

माणसाला त्याने केलेल्या कर्मानुसार फळ मिळत असते. परंतु बऱ्याजणांची तक्रार असते की, आपण दिवसभर राबूनही कसेबसे पोटापुरते मिळते, तर तेच काम करणारा आपला शेजारी मात्र सुखात असतो. तसेच तो काम केल्यानंतर समाधानीही दिसतो. गीतेत भगवंतानेही म्हटले आहे की कर्मयोग याचा अर्थ कौशल्याने वा शास्त्रीय पध्दतीने काम करणे. कर्मानुष्टानाचा विधी व्यवस्थित समजून घेतल्यासच माणसाला उत्तम फळ मिळू शकते. सर्व कर्मांचा उद्देश मनामध्ये पूर्वीपासून असलेली शक्ती प्रकट करणे व आत्मा जागृती करणे, प्रत्येक माणसामध्ये पूर्ण ज्ञान व पूर्ण शक्ती असते. निरनिराळी कर्मे या महान शक्ती जागृत करण्याचे व प्रकट करण्याचे फक्त साधन आहे. या साधनाचा आपण किती कौशल्याने वापर करतो यावर त्याचे फळ अवलंबून असते.

## उपदेशकथा

### प्रयत्न, परिश्रम अन परमेश्वर

ही गोष्ट साधारण १९३७–३८ सालातली आहे. सोळा–सतरा वर्षाचे युवा नौशाद लखनौहून काहीतरी कामगिरी करण्यास बाहेर पडले होते. मुंबईत एक विद्वान प्राध्यापक नामीसाहेब कुलाब्यात राहात. त्यांच्या घरी ओळखीनं नौशाद राहात व दिवसभर कामाच्या शोधात स्टुडिओतून फिरत असत. मुंबईच्या भुलभुलैयात गरीब स्वभावाच्या नौशादचे पाकिट हरवले. जवळच पुंजी संपली. पण त्यांनी प्रयत्न मात्र सोडले नाहीत. कुलाब्यापासून दादरपर्यंत पायी चालून आलेल्या व दमून झोपलेल्या नौशादाकडे नामीसाहेबांचे लक्ष गेले. त्यांचे जोडेदेखील फाटून गेले होते. दुसऱ्या दिवशी त्यांनी नौशादकडून सर्व हकीकत समजली. पैशाशिवाय या मुंबईत चिकाटीनं राहणाऱ्या नौशादचं त्यांनी कौतुक केलं. ते म्हणाले, 'तू एक दिवस मोठा माणूस होणार आहेस व त्यावेळी मी तुला नक्की भेटेन.' त्यानंतर स्वत: गरीब असलेल्या नामीसाहेबांनी त्यांना थोडे पैसे दिले व नौशाद यांच्या डायरीत आपले शब्द टिपून ठेवले. पुढे काळ गेला धर्मपारायण नौशाद यांनी परिश्रमानं, प्रयत्नानं चित्रपटसृष्टीत मोठं नाव कमावलं. स्वत:ची मोठी वास्तू केली. 'बैजू बावरा'च्या यशानं त्यांचं नाव गाजू लागलं. एके दिवशी नामीसाहेब त्यांना भेटायला आले व त्यांना डायरीतल्या पत्राची आठवण करून दिली. त्यांचे शब्द खरे झाले होते.

कथा उपदेश : प्रयत्न आणि परिश्रमाच्या जोडीला परमेश्वरावर श्रद्धा असेल तर जीवनात यश नक्की आहे.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | योग:शुक्ल २०:१०:४८ |
| २४जुलै २०२६ | करण:गर ०९:१३:०१ |
| शुक्रवार | करण:वणिज २२:२२:५६ |
| विक्रम संवत्– २०८२ | सूर्य:कर्क |
| आषाढ शके | चन्द्र:वृश्चिक |
| संवत्– १९४८ | हिजरी सन् – १४४८ |
| संवत्सर – पराभवनाम | मुस्लिम मास – सफर |
| अयन– दक्षिणयन | तारीख – ९ |
| मास– आषाढ | विशेष |
| ऋतु– सौर वर्षा | पुनर्यात्रा |
| शुक्ल पक्ष | दिगंबर महाराज पितळे |
| तिथि:दशमी ०९:१३:०१ | पुण्यतिथी – मेहकर |
| नक्षत्र:अनुराधा | (बुलढाणा) |
| २८:३६:१२+ | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०२०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | | | 2 | 1 | 9 | | 8 | 5 |
| | | 2 | | 6 | 4 | | | |
| 5 | | | 3 | | | 4 | 9 | |
| 3 | | | 8 | | 2 | 1 | | |
| | | | | 9 | | | | |
| | | 9 | 1 | | 3 | | | 6 |
| | 3 | 5 | | | 8 | | | 4 |
| | | | 7 | 4 | | 3 | | |
| 6 | 8 | | 9 | 3 | 1 | | | 7 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १०१९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 5 | 2 | 3 | 1 | 8 | 7 | 6 | 9 |
| 7 | 1 | 9 | 4 | 6 | 2 | 3 | 8 | 5 |
| 6 | 3 | 8 | 5 | 7 | 9 | 1 | 4 | 2 |
| 3 | 4 | 5 | 1 | 9 | 6 | 8 | 2 | 7 |
| 9 | 7 | 6 | 8 | 2 | 4 | 5 | 3 | 1 |
| 2 | 8 | 1 | 7 | 3 | 5 | 4 | 9 | 6 |
| 5 | 9 | 3 | 6 | 4 | 1 | 2 | 7 | 8 |
| 1 | 6 | 4 | 2 | 8 | 7 | 9 | 5 | 3 |
| 8 | 2 | 7 | 9 | 5 | 3 | 6 | 1 | 4 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १२१६ – ऑनरियस तिसरा पोपपदी.
- १४८७ – नेदरलँडच्या लीयुवार्डेन शहरातील नागरिकांनी परदेशी बीयरवरील बंदीविरुद्ध आंदोलन सुरू केले.

### राष्ट्रीय

- १९११ – बंगळुरमध्ये इंडियन इन्स्टिट्युट ऑफ सायन्सची स्थापना.
- १९९७ – माजी पंतप्रधान गुलझारीलाल नंदा व कै. अरुणा आसेफअली यांना 'भारतरत्न' हा किताब बहाल करण्यात आला.
- २००६ – लोकसभेच्या २४ तासांच्या टीव्ही वाहिनीस सुरूवात झाली. याबरोबरच संसदेची पूर्णवेळ टीव्ही वाहिनी असलेला भारत हा जगातील पहिला देश बनला.
- २००६ – भारतीय ज्यूनिअर पुरुष संघाने 'आयएसएसएफ' विश्वचषक नेमबाजी स्पर्धेच्या दहा मीटर एअर पिस्तुल स्पर्धेचे कांस्य पदक जिंकले.

### जन्म

- १७८६ – जोसेफ निकोलेट, फ्रेंच गणितज्ञ व शोधक.
- १८५१ – फ्रीडरिक शॉटकी, जर्मन गणितज्ञ.
- १८६७ – फ्रेट टेट, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- १८९७ – आमेलिया इअरहार्ट, अमेरिकन वैमानिक.
- १९११ – पन्नालाल घोष, प्रसिद्ध बासरीवादक.
- १९१७ – जॅक मोरोनी, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
- १९३७ – मनोजकुमार, बॉलीवुड अभिनेता.

### निधन

- ११२९ – शिराकावा, जपानी सम्राट.
- १८६२ – मार्टिन व्हॅन ब्युरेन, अमेरिकेचा ८वा राष्ट्राध्यक्ष.
- १९७० – पीटर दि नरोन्हा, भारतीय उद्योगपती.
- १९८० – पीटर सेलर्स, ब्रिटीश अभिनेता.

## : SMS :

Teacher: Zindagi me kuch ban na hai.
Main: Ban gaya sir..."Last seen" Sab dekhte hain, baat koi nahi karta.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २५.६ | २३.१ |
| अहमदनगर | २६.३ | २१.८ |
| अकोला | २६.४ | २५ |
| अमरावती | २६ | २४.५ |
| बीड | २७.२ | २४.३ |
| भंडारा | २५.९ | २४.४ |
| बुलढाणा | ४० | २६.३ |
| चंद्रपूर | २७ | २४.७ |
| चेन्नई | ४०.५ | ३१.१ |
| नवी दिल्ली | ३८.९ | ३२ |
| धुळे | २९.९ | २४.९ |
| गोंदिया | २५.५ | २४.१ |
| जळगाव | २७.२ | २४.८ |
| कोल्हापूर | २५.१ | २२.३ |
| लातूर | ३०.३ | २१.८ |
| मुंबई | ३३.३ | २७.१ |
| नागपूर | २६.६ | २३.९ |
| नांदेड | ३०.१ | २३.५ |
| नंदूरबार | २७.४ | २५.५ |
| नाशिक | २५.३ | २२.७ |
| पुणे | २३.८ | २१.१ |
| पंढरपूर | ३१.५ | २३.७ |
| सातारा | २५.१ | २१ |
| सांगली | २६ | २२.९ |
| सोलापूर | ३१.४ | २३.६ |
| वर्धा | २६.५ | २४.५ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** महत्वाचे निर्णय घेण्यास व्यवसायातील महत्वाचे करार–मदार करण्यास आजचा दिवस चांगला आहे.

**तुळ :** हाताखालील कर्मचाऱ्यांचे उत्तम सहकार्य लाभेल. काहींची अध्यात्मिक प्रवृत्ती वाढीस लागेल.

**वृषभ :** संततीसौख्य लाभेल. मुलामुलींसंदर्भात एखादी भाग्यकारक घटना घडेल. त्यांचे काही प्रश्न असल्यास ते मार्गी लावाल.

**वृश्चिक :** वाहने सावकाश व जपून चालवावीत. तुमची चीडचीड होणार आहे. आरोग्याच्या थोड्याफार तक्रारी जाणवतील.

**मिथुन :** आर्थिक लाभाचेदृष्टीने एखादी नवी योजना नजरेसमोर येईल. व्यवसायात नवीन कल्पना अंमलात आणू शकाल. दिवस फारसा अनुकूल नाही.

**धनु :** नातेवाईकांशी मतभेदाची शक्यता आहे. मानसिक अस्वास्थता जाणवेल. प्रकृतीकडे लक्ष द्यावयास हवे. प्रवास शक्यतो टाळावेत.

**कर्क :** तरीही जिद्दीच्या जोरावर तुम्ही तुमची आजची कामे पार पाडू शकाल. वाहने जपून व सावधानतेने चालवावीत. प्रवास टाळावेत.

**मकर :** नवीन हितसंबंध निर्माण होतील. अपेक्षित गाठीभेटी पडतील. सध्या आपणाला नातेवाईकांचे सहकार्य मिळणार नाही, हे गृहितच धरावयास हवे.


**सिंह :** महत्वाचे निर्णय नकोत. काहींची अध्यात्मिक प्रगती होईल. आज तुम्हाला महत्वाच्या आर्थिक कामांत पत्नीचा सल्ला उपयोगी ठरणार आहे.

**कुंभ :** आज पूर्ण दिवस तुम्ही उत्साहाने व उमेदीने कार्यरत राहणार आहात. आरोग्य उत्तम राहील. व्यवसायात नवीन बाजारपेठ मिळवू शकाल.

**कन्या :** वैवाहिक सौख्य उत्तम लाभेल. मित्रांचे सहकार्य उत्तम लाभेल. अपेक्षित गाठीभेटी पडतील. उत्साह व उमेद वाढेल. प्रवास सुखकर होतील.

**मीन :** नोकरी–व्यवसायात उत्तम महत्वाचे निर्णय घेण्यास तसेच आगामी काळाचे नियोजनास दिवस अनुकूल आहे.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०२०



**आडवे शब्द**

१. गाळ पण टाकाऊ नाही
२अ. ताळतंत्र सुटलेला
५. रोड टॅक्स–मराठीत
८. तोंडाचा पट्टा
११. पुरणपोळीबरोबर केली जाणारी आमटी
१२. अटीची भाषा
१४. चीज, वस्तू
१५. त्याग केला
१७. अर्धांगवायू
१९. ढीग
२१. सत्ता
२३. उत्तराधिकारी
२४. वाघाची मावशी
२५. शेवट, नाश
२६. मालक, सरदार, शासनसत्ता
२८. पाण्यापासून उत्पन्न
३१. चामखीळ
३३. एकरूप
३४. झाडाचे टॉनिक
३५. सरस्वती (ग्र.)
३६. बातमी
३७. वारा, त्रास
३८. भांडण
४०. कैफ, धुंदी
४२. कधी मर्दानगीचे कधी भिकारपणाचे लक्षण
४३. नऊ भावना
४५. कडक व चिवट
४६. एक देवयोनी, स्वर्गातील गायक
४७. संत, अवलिया
४८. रागाचा ठिकाणा
४९. गंमत, मजा
५०. स्वयंपाकी
५३. आवाजांचा गोंधळ
५४. सन्मानाची रक्कम
५६. खोदकाम
५८. पुत्री, मुलगी
६०. लाकडी जिना
६२. दात
६४. जबरदस्त, धिप्पाड
६७. चेहऱ्यावरील कांती
६८. काळ्या तोंडाचे माकड
७०. राजपुत्र सलीमची प्रेयसी
७२.सवाद्य
७४. हिंदीत झणझणीत
७५. गायीचे पिल्लू
७७. शिक्षा
७८. मोगऱ्याची माळ
८०. खूळ
८२. अगदी सरळ
८३. दुसऱ्याच्या मनातील जाणणारा
८४. रश्शावरील तवंग, कट

**उभे शब्द**

१. उमदा, रंगेल
२. बतावणी
३. आलेख– चढता वा उतरता
४. पुरुष
५. घागरा
६. बटवा
७. रमापती
८. पृथ्वी, गाय
९. पूर्ण भरतीची वेळ
१०. सिंह
१३. समशेर
१६. पुत्र (हिंदी)
१८. दिवस
२०. लिंबू पाणी
२२. गंध
२४. पतंगाचा धागा
२५. अकस्मात
२६अ. ईदने सांगता होणारा उपवासाचा महिना
२७. खोकला
२८. पाणी देणारा
२९. फळातील द्रव
३०. वस्ती
३२. जास्तीत जास्त व कमीत कमी
३३. टोळीचा प्रमुख
३४. धोकादायक
३७. संधी
३९. बरोबर आलेला फौजफाटा
४१. शिक्षा
४३. पाताळात भोगाव्या लागणाऱ्या वेदना
४४. संपूर्ण
५०. घराणे
५१. शर्करा
५२. पाडाव, हार
५५. फायदा
५७. पुरुष
५९. वनवास
६१. दार
६३. हुण्डा (हिंदी)
६५. घरंदाज, कुलीन स्त्री
६६. टपालकचेरी
६९. मत देणे
७१. मुंग्यांचे घर
७३. धट्टकट्टा
७६. फटाक्यांची माळ
७७. उथळ पसरट वाटी
७९. रात्र
८१. निर्माण झालेले अंतर

**जम्बो शब्दकोडे क्र. १०१९ चे उत्तर**

आडवे उत्तर १.कसम ४.तेंडुलकर ८.हरहर १२.पारावार १३.रमणीय १४.राजधानी १६.काकीनाडा १८.गरम १९.मज २१.समय २३.खोलणे २५.गावकुटाळ २६.रद २७.पारवा ३०.काका ३१.पारा ३२.दमट ३४.कसर ३७.सनदशीर ३८.पायल ३९.पसायदान ४१.कोमल ४३.चाक ४४.मात्रा ४५.रस्सी ४६.लवलव ४७.वरवर ५०.रंभा ५१.आवळा ५२.वसाहत ५५.रत्न ५६.भार ५७.तपन ५८.विनाकारण ६०.शहर ६२.पाक ६३.राम ६५.रवाना ६६.वडीलधारी ६८.तडकाफडकी ७१.तसदी ७४.रसकस ७७.तरुण ७८.वनमाला ७९.रविवार

उभे उत्तर : १.कपार २.सरा ३.मवाली ५.डुलकी ६.कारडा ७.रम ८.हयगय ९.हरामखोर १०.रज ११.धनी १५.धावणे १६.काजळ १७.नाठाळ १९.पाव २०.मटार २१.सरकार २२.मद २४.लवाद २५.गायक २७.पारायण २८.खोट २९. मनन ३०.काशीयात्रा ३१.पापा ३३.मखमल ३५.सपक ३६.रसा ३७.सदाशिव ४०.कारभार ४१.कोवळा ४२.लवकर ४३.चाकवत ४६.लवकुश ४७.वहन ४८.रत ४९.रचना ५३.सापशिडी ५४.फारकत ५६.भारवाहक ५८.विपरीत ५९.कापा ६१.हर ६३.राका ६४.मफलर ६६.वसंत ६७.लक्ष्मण ६९.डगला ७०.कीरवा ७२.सव ७३.दीन ७५.सर ७६.सर्दी

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे




## 'गजर माऊलीचा' : भक्तीगीतांच्या कार्यक्रमात रसिक तल्लीन

**पुणे : दैनिक संध्या**

'मोगरा फुलला', 'ओंकार स्वरूपा', 'अबिर गुलाल', 'माझे माहेर पंढरी', 'माझी रेणुका माऊली' अशा संत रचनांसह विविध भक्तीगीतांनी रसिकांची सायंकाळ भक्तीरसात चिंब झाली. निमित्त होते पूना गेस्ट हाऊस स्नेह मंचतर्फे सूर पालवी प्रस्तुत 'गजर माऊलीचा' या कार्यक्रमाचे! पूना गेस्ट हाऊस येथे सोमवारी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सुप्रसिद्ध गायिका पल्लवी पत्की-होले, सुप्रसिद्ध गायक विनल देशमुख यांनी गीते सादर केली. कार्यक्रमाची संकल्पना संजय हिवराळे यांची होती तर निवेदन आकाश सोळंकी यांनी केले. सुनील जाधव (की-बोर्ड), संजय हिवराळे (ऑक्टोपॅड), रोहित साने (तबला) यांनी साथसंगत केली. कार्यक्रमाविषयी पूना गेस्ट हाऊसचे संचालक डॉ. किशोर सरपोतदार यांनी माहिती दिली. संयोजन अजित कुमठेकर यांनी केले. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस, रंगत-संगत प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर, संवादिनी वादक आशिष केसकर, कवी-गझलकार जयंत भिडे, शिल्पकार विवेक खटावकर, डॉ. प्रसाद पिंपळखरे, राजकुमार सुराणा, अनिल घाडगे, पूर्णिमा पवार, ॲड. सतीश शेळके आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात गणेश वंदना आणि 'जय जय राम कृष्ण हरी' या पारंपरिक पंचपदीने करण्यात आली. 'माय भवानी तुझे लेकरू', 'विठ्ठला तू वेडा कुंभार', 'ऐरणीच्या देवा तुला', 'शोधीसी मानवा', 'शंभो शंकरा', 'चंद्रभागेच्या तिरी', 'अंजनीच्या सुता' अशा भक्तीगीतांसह संत मीराबाईंवरील 'ऐसी लागी लगन' ही रचनाही सादर करण्यात आली. सर्वच रचनांना रसिकांनी टाळ्यांच्या गजरात साथ देत कार्यक्रमाचा आनंद घेतला. 'आदिमाया अंबाबाई', 'आई भवानी तुझ्या कृपेने', 'खंडेरायाच्या लग्नाला', 'लल्लाटी भंडार' या भक्तीरचनांमधून रसिकांना पवित्र वातावरणाची अनुभूती दिली. 'नादातूनी या नाद रंगतो श्रीराम जय राम जय जय राम' या श्रीरामाच्या जयघोषात कार्यक्रमाची सांगता होताना कलाकारांच्या सुरात सूर मिसळत रसिक श्रीरामाच्या चरणी लीन झाले.



## खडकवासला धरणातून रात्री ८ वाजता ३,८२५ क्युसेक विसर्ग

**पुणे : दैनिक संध्या**

खडकवासला धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे धरणातीलपाणीसाठ्यात वेगाने वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर आज (२३ जुलै) रात्री ८ वाजल्यापासून खडकवासला धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदीपात्रात ३,८२५ क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात येणार आहे. पावसाचे प्रमाण आणि धरणात होणारी आवक लक्षात घेऊन या विसर्गामध्ये आवश्यकतेनुसार वाढ अथवा घट केली जाऊ शकते, अशी माहिती खडकवासला पाटबंधारे विभागाने दिली आहे. सायंकाळी ५ वाजेपर्यंत खडकवासला धरणात १.८६ टीएमसी (९४.०८ टक्के) पाणीसाठा असून धरणात १७९ एमसीएफटी पाण्याची आवक सुरू होती. चारही धरणांमध्ये मिळून ७४६ एमसीएफटी पाण्याची आवक झाली असून, खडकवासला धरणसाखळीत एकूण २१.७० टीएमसी (७४.४४ टक्के) पाणीसाठा उपलब्ध आहे. गेल्या वर्षी याच दिवशी हा साठा २३.३० टीएमसी (७९.९४ टक्के) होता. धरणसाखळीतील पानशेत धरणात ८.३३ टीएमसी (७८.२२ टक्के), वरसगाव धरणात ९.३७ टीएमसी (७३.०६ टक्के), तर टेमघर धरणात २.१५ टीएमसी (५७.९३ टक्के) पाणीसाठा आहे. प्रशासनाने नागरिकांना मुठा नदीपात्रात उतरू नये, नदीकाठावर ठेवलेले साहित्य, वाहने अथवा जनावरे तातडीने सुरक्षित ठिकाणी हलवावीत, तसेच सखल भागातील नागरिकांनी विशेष दक्षता घ्यावी, असे आवाहन केले आहे. परिस्थितीनुसार विसर्गात बदल होऊ शकत असल्याने नागरिकांनी अधिकृत सूचनांवर लक्ष ठेवण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

## ४ कोटी मुले लठ्ठपणाच्या विळख्यात, जंकफूडवर कठोर निर्बंधांची शिफारस

**पुणे : दैनिक संध्या**

भारतातील ५ ते १८ वर्षे वयोगटातील सुमारे ४ कोटी मुले जास्त वजन-लठ्ठपणाने ग्रस्त असून, सध्याची स्थिती कायम राहिल्यास २०३० पर्यंत जगातील लहान मुलांच्या लठ्ठपणाच्या एकूण प्रमाणात भारताचा वाटा ११ टक्क्यांहून अधिक असेल, असा इशारा 'लेट्स फिक्स अवर फूड' या धोरणपत्रिकेत (पॉलिसी डॉक्युमेंट) देण्यात आला आहे. मुलांमध्ये वाढत असलेल्या लठ्ठपणा, मधुमेह आणि इतर असंसर्गजन्य आजारांना आळा घालण्यासाठी शाळांमध्ये जंकफूडच्या विक्री आणि जाहिरातींवर कठोर निर्बंध घालण्यासह अनेक उपाययोजनांची शिफारस करण्यात आली आहे. भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (आयसीएमआर) - नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ न्यूट्रिशन यांच्या नेतृत्वाखाली तयार करण्यात आलेल्या या धोरणपत्रिकेनुसार, भारतात १० कोटींहून अधिक प्रौढ मधुमेह, ३१ कोटी उच्च रक्तदाब आणि २५ कोटी स्थुलतेने ग्रस्त आहेत. त्याच बरोबर मुलांमध्येही जंकफूड, जास्त साखर, मीठ आणि चरबीयुक्त पदार्थांचे वाढते सेवन चिंताजनक ठरत आहे. धोरणपत्रिकेनुसार, देशातील सुमारे १० लाख शाळांमध्ये २४.७ कोटी विद्यार्थी शिक्षण घेत असून, एक विद्यार्थी १० ते १२ वर्षांच्या कालावधीत सुमारे १२ हजार तास शाळेत घालवतो. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यदायी आहाराच्या सवयी विकसित करण्यासाठी शाळा हे सर्वात प्रभावी व्यासपीठ असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मुलांना लक्ष्य करून करण्यात येणाऱ्या जंकफूडच्या जाहिरातींवर कायदेशीर निर्बंध आणणे, डिजिटल माध्यमांवरील प्रभावी नियंत्रण आणि 'एचएफएसएस' अन्नपदार्थांची स्पष्ट कायदेशीर व्याख्या करण्याचीही आवश्यकता धोरणपत्रिकेत अधोरेखित करण्यात आली आहे. अहवालात शाळांच्या कॅन्टीनमध्ये तसेच शाळेबाहेरील परिसरात उच्च चरबी, साखर आणि मीठ असलेले पदार्थ सहज उपलब्ध असल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली आहे. अन्नसुरक्षा आणि मानके प्राधिकरणाच्या २०२० च्या नियमांची प्रभावी अंमलबजावणी, शाळेच्या ५० मीटर परिसरात जंकफूड विक्री व जाहिरातींवर बंदी, विद्यार्थ्यांसाठी वार्षिक आरोग्य व पोषण अहवाल तयार करणे आणि दररोज किमान ६० मिनिटांचा शारीरिक व्यायाम बंधनकारक करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

# 'दगडूशेठ' गणपती ट्रस्ट तर्फे वारकऱ्यांची आरोग्यसेवा

### श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचा पुढाकार ; उपक्रमाचे ३७ वे वर्ष ; तीन पालख्यांसोबत सुसज्ज रुग्णवाहिका, डॉक्टर्स आणि वैद्यकीय सेवेची विनामूल्य सोय



■ पुणे (दै. संध्या)

ज्ञानोबा माऊली, तुकाराम... च्या गजरात कित्येक मैल पायी प्रवास करत विठ्ठल रखुमाईच्या भेटीच्या ओढीने जाणाऱ्या लाखो वारकऱ्यांची आरोग्यसेवा श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट च्यावतीने करण्यात आली. आषाढी वारीमध्ये संपूर्ण पायी प्रवासात तसेच प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी आरोग्यसेवा, मोफत औषध वाटप आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था देखील करण्यात आली होती. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज,जगद्गुरु तुकाराम महाराज आणि संत सोपानकाका यांच्या पालखी सोहळ्यासोबत वारक-यांच्या सेवेकरीता तीन सुसज्ज रुग्णवाहिका श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने पालख्यांसोबत पुण्यातून रवाना झाल्या होत्या. याशिवाय वारक-यांच्या सेवेत पिण्याच्या पाण्याचे टँकर देखील पाठविण्यात आले होते. जय गणेश रुग्णसेवा अभियानांतर्गत हा उपक्रम दरवर्षी राबविण्यात येत असून मोठया प्रमाणात डॉक्टर्स, औषधे व आरोग्यविषयक सेवा पालखी सोहळा समारोपापर्यंत विनामूल्य पुरविण्यात येत आहे. ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, ट्रस्टचे उपाध्यक्ष व उपक्रमाचे नियोजन करणारे डॉ.रामचंद्र उर्फ बाळासाहेब परांजपे, उपाध्यक्ष माणिक चव्हाण, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, ट्रस्टचे वैद्यकीय विभाग प्रमुख राजेंद्र परदेशी यांसह मंडळाचे पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविला जातो. उपक्रमाचे यंदा ३७ वे वर्ष आहे. डॉ.रामचंद्र उर्फ बाळासाहेब परांजपे म्हणाले, कित्येक किलोमीटरचा पायी प्रवास करणा-या वारक-यांच्या आरोग्याची काळजी घेत, आवश्यक आरोग्यविषयक सेवा त्वरीत मिळाव्यात, याकरीता या उपक्रमाचे आयोजन केले जाते. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीसोहळ्यात सासवड, जेजुरी, वाल्हे, लोणंद, फलटण, तरडगाव, माळशिरस, वाखरी येथे, संत तुकाराम महाराजांच्या पालखीसोहळ्यात लोणी काळभोर, यवत, बारामती, बेलवाडी, इंदापूर, अकलूज, वाखरी येथे आणि संत सोपानकाका पालखी सोहळ्यात सोमेश्वरनगर, बारामती, लासुर्णे, अकलूज, भंडी शेगांव, वाखरी आदी ठिकाणी आरोग्यसेवा देण्यात आली. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट आणि सहयोगी वैद्यकीय संस्थांतर्फे पालखी सोहळा ज्या ज्या ठिकाणी मुक्कामास असतो, तेथे फिरता दवाखाना देखील चालविला गेला. यामध्ये त्वचा रोग, कान नाक घसा, नेत्र तपासणी, रक्तदाब, शर्करा तपासणी अशा विविध तपासण्या करण्यात आल्या होता.

## मुक्त संगीत चर्चासत्राचे दि. ३० व दि. ३१ रोजी आयोजन

■ पुणे (दै. संध्या)

शास्त्रीय संगीताचा प्रचार व प्रसार तसेच संगीत विषयाच्या अभ्यासकांना सांगीतिक प्रबोधन करणारे सप्रात्यक्षिक व्याख्यान अर्थात मुक्त संगीत चर्चासत्राचे गुरुवार, दि. ३० आणि शुक्रवार, दि. ३१ जुलै रोजी आयोजन करण्यात आले आहे. गानवर्धन आणि व्हायोलिन अकॅडमीचे स्वरझंकार ज्ञानपीठ यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रमाचे होत आहे.

दोनही दिवस कार्यक्रम एस. एम. जोशी सभागृह येथे सायंकाळी ५:३० वाजता आयोजित करण्यात आला असून रसिकांसाठी विनामूल्य खुला आहे, अशी माहिती गानवर्धनचे अध्यक्ष डॉ. दयानंद घोटकर आणि व्हायोलिन अकॅडमीचे संचालक पंडित अतुलकुमार उपाध्ये यांनी निवेदनाद्वारे कळविली आहे.

दि. ३० रोजी 'सुगम संगीतासाठी शास्त्रीय संगीत आणि इतर काही' या विषयावर सुप्रसिद्ध पार्श्वगायिका अनुराधा मराठे बोलणार असून त्यांच्याशी गानवर्धनचे अध्यक्ष डॉ. दयानंद घोटकर संवाद साधणार आहेत.

दि. ३१ रोजी 'जलतरंगाचे अंतरंग' या विषयावर सुप्रसिद्ध जलतरंग वादक मिलिंद तुळाणकर प्रात्यक्षिकासह व्याख्यान देणार आहेत. त्यांच्याशी ऋतुजा फुलकर संवाद साधणार आहेत.

याप्रसंगी विदुषी कै. डॉ. सुजाता सुरेश नातू पुरस्कृत कथक नृत्य युवा कलाकार पुरस्कार आदिती देवधर, उत्कृष्ट संगतकार पुरस्कार तालवादक मंगेश करमरकर, पुरस्कार शास्त्रीय गायनासाठी सुशीला बाळकृष्ण न्यास पुरस्कृत युवा कलाकार आदिश्री पोटे आणि गानवर्धनचे संस्थापक कै. कृ. गो. धर्माधिकारी पुरस्कृत संगीत पारंगत पुरस्कार मिलिंद तुळाणकर यांना प्रदान करण्यात येणार आहे. संगीत रंगभूमीवरील ज्येष्ठ गायक-अभिनेत्री निर्मला गोगटे यांचाही याप्रसंगी विशेष सत्कार करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. प्रकाश भोंडे असून डॉ. भास्कर हर्षे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

## गरजू विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलले आनंदाचे हास्य

### गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला मदतीचा हात; शालेय साहित्याचे वाटप

■ पुणे (दै. संध्या)

ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे आणि शैक्षणिक साहित्याअभावी त्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होऊ नयेत, या उद्देशाने स्टारलाईट म्युझिकल इव्हेंट्स आणि अविरत फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय साहित्य वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला.

पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भोसलेवाडी तसेच रोकडोबानाथ विद्यालय, भांडगाव येथे गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले.

या वेळी स्टारलाईट म्युझिकल इव्हेंट्स आणि अविरत फाउंडेशनचे आकाश जाधव, वंदना वशिष्ठ आणि रूपाली लाहोटी उपस्थित होते. भोसलेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक समद पठाण, दिपाली माळी, राजेंद्र



जगताप, सचिन गुंड आणि अमोल भोसले उपस्थित होते.

तसेच रोकडोबानाथ विद्यालय, भांडगाव येथील मुख्याध्यापक सतीश कदम, नेवसे सर, मारुती पवार, दीपक थोरात, गाडेकर सर आणि रत्नपारखी मॅडम यांची उपस्थिती होती.

या उपक्रमासाठी अविरत फाउंडेशनच्या अध्यक्षा हेमाताई लाळगे तसेच सदस्य त्रिशाला वर्मा, अनोद गोस्वामी, दीपक फुलझेले, सचिन कुंभार आणि गणेश गोंजारे यांनी विशेष सहकार्य केले.

ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन राबविण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमाचे पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांकडून कौतुक करण्यात आले. "ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत करणे म्हणजे त्यांच्या शिक्षणाच्या प्रवासाला बळ देणे होय. प्रत्येक मुलाला शिक्षणाची समान संधी मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला असून, विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदाचे हास्य हीच आमच्या कार्याची खरी पावती आहे."

## भारती विद्यापीठ आयएमईडीचा इंडक्शन कार्यक्रम उत्साहात

■ पुणे (दै. संध्या)

भारती विद्यापीठ इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड आंत्रप्रेन्युअरशिप डेव्हलपमेंट (आयएमईडी) येथे एमबीए आणि एमसीए अभ्यासक्रमाच्या २०२६-२८ या शैक्षणिक वर्षासाठीच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या स्वागत व दीक्षारंभ कार्यक्रमाची उत्साहपूर्ण सुरुवात भारती विद्यापीठाच्या पौड रस्ता कॅम्पस येथील सभागृहात झाली. भारतातील १६ हून अधिक राज्यांतील आणि ६५ पेक्षा अधिक शहरांमधून आलेल्या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. या कार्यक्रमाला भारती विद्यापीठाचे कार्यवाह व प्र-कुलगुरू डॉ. विश्वजीत कदम, भारती विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ) चे कुलगुरू प्रा. डॉ. विवेक सावजी, कुंभमेळा आयुक्त आयएएस अधिकारी शेखर सिंह हे प्रमुख पाहुणे म्हणून तसेच पीएनजी ज्वेलर्स लिमिटेडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक सौरभ गाडगीळ हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.आयएमईडीचे संचालक डॉ. श्रवण कडवेकर,उपसंचालक डॉ. आर. व्ही. महाडिक यांच्यासह प्राध्यापक वर्ग उपस्थित होता. शेखर सिंह आणि सौरभ गाडगीळ यांनी विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणा, शिस्तबद्ध अंमलबजावणी, सातत्यपूर्ण शिक्षण, सांघिक कार्य आणि आव्हाने स्वीकारण्याचे धैर्य ही यशस्वी व्यवस्थापनाची सूत्रे असल्याचे सांगितले. त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवांमुळे आजच्या गतिमान व्यावसायिक वातावरणातील नेतृत्व आणि निर्णयक्षमतेबाबत विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन मिळाले.प्रमुख पाहुणे शेखर सिंह यांनी "जगातील सर्वात मोठ्या मानवी मेळाव्याचे व्यवस्थापन - कुंभमेळा" या विषयावर प्रभावी मार्गदर्शन केले. आपल्या प्रशासकीय अनुभवाच्या आधारे त्यांनी धोरणात्मक नियोजन, नेतृत्व, समन्वय, संकट व्यवस्थापन आणि लोकसेवेचे महत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी आपल्या व्यावसायिक जीवनात लवचिकता, परिस्थितीनुसार जुळवून घेण्याची क्षमता आणि नैतिक नेतृत्व विकसित करावे, असे आवाहन त्यांनी केले."विश्वास आणि परंपरेपासून जागतिक विस्तारापर्यंत वारसाहक्काचा उद्योग उभारण्याचा प्रवास" या विषयावर मार्गदर्शन करताना सौरभ गाडगीळ यांनी आपल्या उद्योजकीय प्रवासातील व्यवस्थापनाचे महत्त्वपूर्ण धडे विद्यार्थ्यांसमोर मांडले.

## दीर्घकालीन निरामय आरोग्यासाठी आयुर्वेद महत्त्वपूर्ण

■ पुणे (दै. संध्या)

"आयुर्वेद हा भारताचा प्राचीन आणि समृद्ध ज्ञानवारसा असून, आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत दीर्घकालीन निरामय आरोग्य राखण्यासाठी त्याचे महत्त्व अधिक अधोरेखित होत आहे. आधुनिक वैद्यकासोबत आयुर्वेद आणि निसर्गोपचार यांचा समन्वय साधल्यास अनेक जीवनशैलीजन्य आजारांवर प्रभावी नियंत्रण मिळवता येऊ शकते. मात्र, आयुर्वेदाच्या शास्त्रीय तत्त्वांची आणि त्याच्या उपयुक्ततेची पुरेशी माहिती अजूनही समाजापर्यंत पोहोचलेली नाही. त्यामुळे आयुर्वेदाबाबत जनजागृती होणे ही काळाची गरज आहे," असे प्रतिपादन राज्याचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी केले. वैद्य डॉ. हरीश पाटणकर यांच्या ज्ञानसंकुल विद्यार्थी संघाच्या प्राचीन संहिता गुरुकुलातर्फे आयोजित 'दिग्गजांच्या मुलाखती' या कार्यक्रमात ते बोलत होते. टिळक रस्त्यावरील न्यू इंग्लिश स्कुलच्या गणेश सभागृहात आयोजित कार्यक्रमावेळी ज्येष्ठ वैद्य प्रवीण जोशी, संयोजक वैद्य डॉ. हरीश पाटणकर, डॉ. स्नेहल पाटणकर, गुरुकुलाचे विश्वस्त सुरेश मोहिते, नीता मोहिते आदी उपस्थित होते. यावेळी वैद्य संतोष सूर्यवंशी यांना 'कै. नानासाहेब पाटणकर स्मृती आयुर्वेद कृषीरत्न पुरस्कार', तसेच वैद्य प्रवीण जोशी यांना 'आचार्य पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

## पवना धरण ९३.०८ टक्के भरले; कोणत्याही क्षणी विसर्गाची शक्यता

### नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

■ पुणे (दै. संध्या)

मावळ तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे पवना धरणातील पाणीसाठ्यात सातत्याने वाढ होत आहे. गुरुवारी (२३ जुलै) सायंकाळी ६ वाजेपर्यंत पवना धरण ९३.०८ टक्के भरले असून, धरणाची पाणीपातळी नियंत्रित ठेवण्यासाठी कोणत्याही क्षणी पवना नदीपात्रात कमी-अधिक प्रमाणात पाण्याचा विसर्ग करण्यात येण्याची शक्यता असल्याचा महत्त्वाचा इशारा जलसंपदा विभागाने दिला आहे. त्यामुळे पवना नदीकाठच्या गावांमधील नागरिक, शेतकरी, व्यावसायिक तसेच लाभधारकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

खडकवासला पाटबंधारे विभागांतर्गत पवना धरण प्रकल्पाच्या पूर नियंत्रण कक्षाकडून यासंदर्भात अधिकृत सूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात तसेच घाटमाथ्यावर सध्या पावसाचे प्रमाण काहीसे कमी झाले असले, तरी धरणात अजूनही कमी-अधिक प्रमाणात पाण्याची आवक सुरू आहे. हवामानातील बदल आणि धरणातील वाढता पाणीसाठा लक्षात घेता परिस्थितीवर जलसंपदा विभागाचे सातत्याने लक्ष असून आवश्यकतेनुसार धरणातून विसर्ग करण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो.

जलसंपदा विभागाने स्पष्ट केले आहे की, धरणातून विसर्ग करण्यापूर्वी अधिकृत माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येईल. त्यामुळे सोशल मीडियावरील अप्रमाणित संदेश किंवा अफवांवर विश्वास न ठेवता केवळ प्रशासनाकडून प्रसिद्ध होणाऱ्या अधिकृत सूचनांवरच विश्वास ठेवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे नदी, नाले आणि ओढ्यांच्या पाणीपातळीत अचानक वाढ होण्याची शक्यता कायम आहे. त्यामुळे पवना नदीपात्रात किंवा नदीकाठी कोणत्याही कारणासाठी जाणे टाळावे. नदीपात्रातील शेती अवजारे, कृषी पंप, मोटारी, पाईपलाइन, जनावरे तसेच इतर साहित्य तातडीने सुरक्षित ठिकाणी हलविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नदीपात्रात मासेमारी, वाळू उपसा, कपडे धुणे किंवा पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पवना नदीवरील अनेक गावांतील शेती, पिण्याच्या पाण्याच्या योजना आणि विविध उपक्रम नदीवर अवलंबून आहेत. त्यामुळे अचानक विसर्ग झाल्यास नदीपात्रातील पाणी वेगाने वाढू शकते. अशा परिस्थितीत कोणतीही जीवित अथवा वित्तहानी होऊ नये, यासाठी प्रशासनाने नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. ग्रामपंचायती, महसूल विभाग, पोलीस प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेलाही आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पवना धरणाचे शाखा अभियंता रजणिस बारिया यांनी सांगितले की, धरणातील पाणीसाठा, पाण्याची आवक आणि हवामानाची स्थिती यावर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे.

परिस्थितीनुसार धरणातून विसर्गाचा निर्णय घेतला जाईल. विसर्गापूर्वी अधिकृत सूचना दिली जाईल. त्यामुळे नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून सहकार्य करावे आणि कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये.

पावसाचा जोर कमी झाला असला तरी धरणातील पाणीसाठा ९३ टक्क्यांच्या पुढे गेल्याने येत्या काही दिवसांत परिस्थिती कशी बदलते याकडे संपूर्ण मावळ तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### भारताचा घसरता प्रजनन दर चिंतेचा विषय

पुणे (दैनिक संध्या) : भारताचा प्रजनन दर १.९ पर्यंत घसरला असून, लोकसंख्या स्थिर ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या २.१ या पातळीपेक्षा तो कमी आहे. बदलती जीवनशैली, करिअरला दिले जाणारे प्राधान्य, उशिरा होणारे विवाह, वाढते वय, ताणतणाव आणि प्रजनन आरोग्याविषयीच्या जागरूकतेचा अभाव यामुळे वंध्यत्वाच्या समस्येत सातत्याने वाढ होत असल्याची चिंता तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर समाजात जनजागृती निर्माण करण्यासाठी झेनिथ ॲडव्हान्स फर्टिलिटी सेंटरतर्फे (Xenith Advanced Fertility Centre) तर्फे १५ जुलै ते १ ऑगस्ट २०२६ या कालावधीत (रविवार वगळून) मोफत फर्टिलिटी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. हा उपक्रम केवळ उपचारांपुरता मर्यादित नसून, वंध्यत्वाबाबत समाजात असलेले गैरसमज दूर करणे, योग्य वयात कुटुंब नियोजनाचे महत्त्व पटवून देणे आणि वेळेवर तज्ज्ञांचा सल्ला घेण्यास प्रोत्साहन देणे हा त्यामागील मुख्य उद्देश आहे. अनेक जोडपी सामाजिक, मानसिक किंवा आर्थिक संकोचामुळे उपचार घेण्यास विलंब करतात. मात्र, वंध्यत्व ही लाज वाटण्याची बाब नसून इतर आजारांप्रमाणेच ती एक वैद्यकीय समस्या आहे, हा संदेश या शिबिरातून दिला जाणार आहे. या शिबिरात सहभागी होणाऱ्या जोडप्यांना मोफत नोंदणी, रक्त तपासणी, आयव्हीएफ पॅकेजवर सवलत, तज्ज्ञ डॉक्टरांचे मोफत मार्गदर्शन, प्रयोगशाळेतील तपासण्यांवर विशेष सवलत तसेच पुरुषांसाठी मोफत वीर्य तपासणी (Semen Analysis) सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. हे शिबिर फॅलोपियन ट्यूबमध्ये अडथळा, अनियमित मासिक पाळी (पीसीओएस/पीसीओडी), वारंवार आयव्हीएफ किंवा आययूआय उपचार अपयशी ठरणे, एंडोमेट्रिओसिस, कारण न समजणारे वंध्यत्व, वारंवार गर्भपात, शुक्राणूंची संख्या कमी किंवा नसणे, शुक्राणूंची हालचाल कमी असणे तसेच बीज निर्मितीतील समस्या असलेल्या जोडप्यांसाठी विशेषतः उपयुक्त ठरणार आहे. झेनिथ ॲडव्हान्स फर्टिलिटी सेंटरमध्ये महिला व पुरुष वंध्यत्व उपचारांसाठी स्वतंत्र तज्ज्ञ विभाग, अत्याधुनिक उपकरणे, अनुभवी डॉक्टर व भ्रूणतज्ज्ञांची (Embryologists) टीम, २५ वर्षांहून अधिक अनुभव, २५ हजारांहून अधिक कुटुंबांना पालकत्वाचा आनंद, उपचारातील पारदर्शकता आणि प्रत्येक रुग्णासाठी स्वतंत्र उपचार आराखडा ही केंद्राची वैशिष्ट्ये आहेत. केंद्रामध्ये आयव्हीएफ, आययूआय, आयसीएसआय, डोनर कार्यक्रम, एग फ्रीझिंग, प्रजनन क्षमता वाढविणाऱ्या शस्त्रक्रिया, पीजीटी, पेसा, टेसा, टीईएसई, क्रायोप्रिझर्वेशन, लेझर हॅचिंग आणि लॅपरोस्कोपी यांसारख्या अत्याधुनिक सेवा उपलब्ध आहेत.

### 26 जुलै रोजी बालगंधर्व येथे डॉ. कुमार सप्तर्षी श्रद्धांजली सभेचे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष, युवक क्रांती दलाचे संस्थापक, माजी आमदार आणि सत्याग्रही मासिकाचे संपादक डॉ. कुमार सप्तर्षी यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी रविवार दि. २६ जुलै रोजी सकाळी १०.०० वाजता बालगंधर्व रंगमंदिर येथे विशेष श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये देशाचे ज्येष्ठ नेते शरद पवार, माजी केंद्रीयमंत्री सुशीलकुमार शिंदे, माजी केंद्रीयमंत्री प्रकाश जावडेकर, विधान परिषदेच्या माजी उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे, माजी खासदार ॲड. वंदना चव्हाण, माजी आमदार उल्हास पवार, शिवसेना (उबाठा) प्रवक्त्या सुषमा अंधारे, माजी आमदार हुसेन दलवाई, महाराष्ट्र टाईम्सचे समूह संपादक पराग करंदीकर, लोकमतचे संपादक संजय आवटे, डॉ. कबीर सप्तर्षी, उपमहापौर परशुराम वाडेकर, भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, ग्राहक पेठेचे सुर्यकांत पाठक, एम.के.सी.एल. चे मार्गदर्शक विवेक सावंत, हमाल पंचायतीचे नितीन पवार, समाजवादी पक्षाचे शहराध्यक्ष जांबुवंत मनोहर आदी श्रद्धांजली सभेत सहभागी होत आहेत. महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान आणि युवक क्रांती दल यांच्या संयुक्त विद्यमाने याचे आयोजन करण्यात आले आहे. पुणेकरांनी या श्रद्धांजली सभेस आवर्जून सहभागी व्हावे असे आवाहन महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे विश्वस्त सचिव अन्वर राजन आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे ॲड. अंकुश काकडे यांनी केले आहे.

# उद्योग-संबंधित शिक्षणाला चालना देणार

## एकात्मिक शिक्षण मार्गांद्वारे एआय, एजेंटिक एआय, प्रगत संगणकीय आणि एंटरप्राइझ तंत्रज्ञान कौशल्यांवर भर

पुणे (दै. संध्या) :

ज्ञान समृद्ध समाजातील उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये उच्च शिक्षण आणि अध्ययनात नाविन्यता आणण्याच्या दृष्टीकोनातून स्थापन झालेल्या द युनिव्हर्सिटी ऑफ द फ्युचर, एनआयआयटी युनिव्हर्सिटीने (एनयू) (NIIT University (NU)) व्यावसायिक परिवर्तनासाठी एआय प्लॅटफॉर्म सर्व्हिसनाऊसोबत शैक्षणिक सहयोग केला आहे. हा सहयोग सर्व्हिसनाऊ युनिव्हर्सिटी अकॅडेमिक पार्टनरशिप्स प्रोग्रामचा भाग आहे, जो जागतिक आणि केंद्रीकृत शिक्षण, तसेच विकास आराखडा असून भविष्यकालीन क्षमता विकसित करण्यावर मुख्यत्वे भर देतो.

या सहयोगाच्या माध्यमातून एनयू आपल्या कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग, एआय अँड डेटा सायन्स आणि सायबर सिक्युरिटी यांसारख्या बी.टेक प्रोग्राम्समध्ये सर्व्हिसनाऊचे




उद्योग-मान्यताप्राप्त शिक्षण मार्ग समाविष्ट करेल. विद्यार्थ्यांना क्लाउड प्लॅटफॉर्म डेव्हलपमेंट, डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन्स, एंटरप्राइझ वर्कफ्लो आणि उदयोन्मुख एआय तंत्रज्ञानातील मागणी असलेल्या कौशल्यांसह सक्षम करणे हा या सहयोगाचा उद्देश आहे.

अभ्यासक्रम एकत्रीकरण धोरणाचा भाग म्हणून विद्यार्थ्यांना सर्व्हिसनाऊ करिअर प्रवासातील सर्टिफाइड सिस्टम ॲडमिनिस्ट्रेटर (सीएसए) आणि सर्टिफाइड ॲप्लिकेशन डेव्हलपर (सीएडी) वर केंद्रित असलेल्या संरचित शिक्षण मार्गांचा लाभ घेता येईल.

प्रगत संगणकीय आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्समधील अध्ययनाला प्रबळ करणे यावर सहयोगाचा मुख्य भर आहे. या अभ्यासक्रमात एजेंटिक एआयचा परिचय देखील समाविष्ट आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना एआय एजंट कशा प्रकारे नियोजन करू शकतात, तर्क लावू शकतात आणि गुंतागुंतीचे एंटरप्राइझ वर्कफ्लो स्वयंचलित करू शकतात, हे समजण्यास मदत होईल.

या सहयोगाबाबत मत व्यक्त करत एनआयआयटी युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष प्रा. प्रकाश गोपालन म्हणाले, "एनआयआयटी युनिव्हर्सिटीमध्ये आम्ही उद्योग-संलग्न शिक्षण अनुभव तयार करण्यासाठी कटिबद्ध आहोत, जे विद्यार्थ्यांना भविष्यासाठी सक्षम करतात. सर्व्हिसनाऊसोबत आमचा सहयोग शैक्षणिक शिस्तीसोबत उद्योग-मान्यताप्राप्त प्रमाणपत्रे आणि व्यावहारिक शिक्षणाच्या संधींचा मेळ घालून कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग, एआय आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानावरील आमचा भर अधिक दृढ करतो. आम्हाचा विश्वास आहे की, हा सहयोग वाढत्या डिजिटल आणि एआय-चालित जगात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये आणि अनुभवांनी विद्यार्थ्यांना सज्ज करण्यास मदत करेल."

## गोपाळ गायन समाजाला १०० वर्षांपूर्वीचा तानपुरा भेट



पुणे (दै. संध्या) :

बालगंधर्व आणि परांजपे कुटुंबियांचा असलेला घरोबा... बालगंधर्वांनी परांजपे कुटुंबाला भेट दिलेला तानपुरा आणि गंधर्वांच्या शेवटच्या काळातील घटना अशा अनमोल आठवणींचा ठेवा प्रसिद्ध रेडिओलॉजिस्ट डॉ.रामचंद्र उर्फ बाळासाहेब परांजपे यांनी पुणेकरांसमोर उलगडला. बालगंधर्वांनी कै. बापूसाहेब व कमलाबाई परांजपे यांना दिलेला १०० वर्षांपूर्वीचा तानपुरा डॉ.रामचंद्र परांजपे यांना गोपाळ गायन समाज संस्थेला भेट दिला. टिळक रस्त्यावरील न्यू इंग्लिश स्कूलच्या गणेश सभागृहात गोपाळ गायन समाज संस्थेच्या शतकोत्तर वाटचालीच्या निमित्ताने आयोजित उत्सवात ही भेट परांजपे कुटुंबियांनी दिली. यावेळी गोपाळ गायन समाजाचे डॉ.विकास कशाळकर, सुरेश साखोळकर, विजयकांत कुलकर्णी आदी उपस्थित होते. संगीत परंपरेचे जतन व संवर्धन करणारी गोपाळ गायन समाज संस्था हा ऐतिहासिक ठेवा असलेला तानपुरा जतन करणार आहे. डॉ.रामचंद्र परांजपे यांच्या मातोश्री कै. कमलाबाई परांजपे या गोपाळ गायन समाजात पं. गोविंदराव देसाई यांच्याकडे शिकत होत्या. प्रत्येक गोकुळाष्टमीला उत्सवात त्यांचे गायन होत असे. सन १९२१ मध्ये मुंबईमध्ये संयुक्त मानापमानचा प्रयोग होता. त्यावेळी संगीतसूर्य केशवराव भोसले यांनी आपला तानपुरा बालगंधर्वांना सप्रेम भेट दिला होता.

## छतावरील सौरऊर्जेस प्रोत्साहनासाठी पुण्यात फिरणार 'सूर्यरथ'

पुणे (दै. संध्या) :

'पीएम-सूर्यघर मोफत वीज योजने'त जास्तीत जास्त घरांवर सौरऊर्जा पॅनेल बसवण्यास प्रोत्साहन देण्यासाठी २६ जुलै २०२६ रोजी पुण्यात चिखली येथे 'सूर्यरथ' या फिरत्या जनजागृती मोहिमेस प्रारंभ होणार आहे.

केंद्रीय नागरी विकास आणि सहकार राज्यमंत्री तथा खासदार मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन होईल. 'नॅशनल सोलर एनर्जी फेडरेशन ऑफ इंडिया'द्वारे (NSEFI) पीडब्ल्यूसी (PwC) आणि एनर्जिवा व्हेंचर्स यांच्या सहकार्याने हा 'सूर्यरथ' सुरू केला जात आहे. ही मोहीम शासनाच्या 'पीएम-सूर्यघर मोफत वीज योजना'चा एक भाग आहे. छतावरील सौरऊर्जा प्रणालीद्वारे देशातील १ कोटी घरांना मोफत वीज उपलब्ध करून देणे हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. हा विशेष 'सूर्यरथ' पुढील आठ दिवस पुणे शहर आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील विविध गृहनिर्माण सोसायट्या, मुख्य चौक आणि निवासी भागांत फिरणार आहे. या रथासोबत तज्ज्ञांचे एक पथक असेल, जे नागरिकांना सौरऊर्जा प्रणालीचे फायदे प्रत्यक्ष समजावून सांगेल. तसेच, छतावर सोलर पॅनेल बसवण्यासाठी मिळणारे शासकीय अनुदान, बँक कर्जाची सुविधा आणि ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया याबद्दल जागेवरच सविस्तर मार्गदर्शन केले जाईल. सूर्यघर योजनेमुळे नागरिकांचे विजेचे बिल शून्यवत होते. त्यामुळे पुणेकरांनी या पर्यावरणपूरक उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन यावेळी करण्यात येणार आहे.

### हवेली पंचायत समितीकडून, स्व. अजितदादा पवार यांच्या प्रथम जयंतीनिमित्ताने

## अजित वनराई उपक्रमांतर्गत ५०० नारळांचे वृक्षारोपण

लोणी काळभोर (दै. संध्या) :

महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या प्रथम जयंतीनिमित्ताने, हवेली तालुक्यात विविध सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन हवेली पंचायत समितीच्या वतीने करण्यात आले. आळंदी म्हातोबा येथे 'अजित वनराई' या उपक्रमांतर्गत ५०० नारळाच्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. तसेच हवेली तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत कार्यालये व परिसरात प्रतिमा पूजन व 'अजितवृक्षासह' वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार ज्ञानेश्वर कटके यांच्या हस्ते करण्यात आले. राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित दादा गट) प्रदेश उपाध्यक्ष सुरेशअण्णा घुले प्रमुख




पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज हिरामण काकडे, उपसभापती सौ. विद्या दत्तात्रय गायकवाड, गटविकास अधिकारी शेखरजी शेलार, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य दिलीप वाल्हेकर, जि.प.सदस्य कोमलताई संदेश आव्हाळे, पं.स.सदस्य कृषिराज दत्तात्रय चौधरी, कोमलताई गणेश कांबळे, सुषमाताई संतोष मुरकुटे, नंदू पाटील काळभोर, दिलीप गाडे यांच्यासह पंचायत समिती हवेलीचे अधिकारी-पदाधिकारी, राष्ट्रवादीचे अनेक पदाधिकारी, आळंदीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य तसेच श्री म्हातोबा जोगेश्वरी कृती समितीचे सर्व पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी स्व. अजितदादा पवार यांच्या विकासाभिमुख कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करत त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ वृक्षारोपणासारखे पर्यावरण संवर्धनाचे उपक्रम राबविणे हीच त्यांना खरी आदरांजली असल्याचे मत व्यक्त केले.

भविष्यातही हवेली तालुक्यात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करून हरित परिसर निर्माण करण्याचा संकल्प करण्यात आला. हवेली तालुक्यात उत्साहपूर्ण वातावरणात प्रतिमा पूजन व वृक्षारोपण कार्यक्रम पार पडून, यानिमित्ताने संपूर्ण हवेली तालुक्याला पर्यावरण संवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश दिला गेल्याचे, सभापती युवराज काकडे यांनी सांगितले.

# अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण जातीय जनगणनेनंतरच करावे

## मागणीसाठी रिपब्लिकन पक्षाचा सोमवारी महामोर्चा

पुणे (दै. संध्या) :

अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरण करण्याचा निर्णय राष्ट्रीय जातीय जनगणनेतील अचूक लोकसंख्येच्या आकडेवारीनंतरच घ्यावा, अन्यथा समाजात अंतर्गत फूट पडण्याची शक्यता असून अनेक समाजघटकांवर अन्याय होऊ शकतो, अशी भूमिका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) यांनी मांडली आहे. या मागणीसाठी सोमवार, २७ जुलै रोजी सकाळी ११ वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील पुतळ्यापासून भव्य महामोर्चाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती पक्षाचे पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे, पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर आणि प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पुणे श्रमिक पत्रकार भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेला पक्षाचे सरचिटणीस महिपाल वाघमारे, शाम सदाफुले, मोहन जगताप, निलेश रोकडे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी संजय सोनवणे म्हणाले की, अनुसूचित जातींतील ५९ समाजघटकांमध्ये सामाजिक ऐक्य टिकवून ठेवणे ही रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)ची ठाम भूमिका आहे. उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेमुळे कोणत्याही




समाजघटकात मतभेद किंवा दुरावा निर्माण होऊ नये, यासाठी ती प्रक्रिया राष्ट्रीय जातीय जनगणना पूर्ण झाल्यानंतरच राबविण्यात यावी. जनगणनेतील लोकसंख्येच्या अचूक आकडेवारीच्या आधारेच न्याय्य निर्णय घेणे शक्य असल्याचे त्यांनी सांगितले.

उपमहापौर परशुराम वाडेकर म्हणाले की, अनुसूचित जातींतील विविध समाजघटकांनी सामाजिक न्याय, समान हक्क आणि आरक्षणासाठी अनेक दशकांपासून एकत्रितपणे संघर्ष केला आहे. त्यामुळे कोणताही निर्णय घाईघाईने घेण्याऐवजी वस्तुनिष्ठ माहितीच्या आधारे घेणे आवश्यक आहे. प्रत्येक जातीची अचूक लोकसंख्या जनगणनेतून समोर आल्यानंतरच उपवर्गीकरणाबाबत धोरण निश्चित केल्यास सर्व समाजघटकांना न्याय मिळू शकेल. राज्यातील उर्वरित ५८ अनुसूचित जातींनाही शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये समान संधी मिळाव्यात, ही पक्षाची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच २०२७ च्या जनगणनेनंतर लोकसंख्येच्या प्रमाणानुसार आरक्षणाच्या रचनेचाही पुनर्विचार करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली.

प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव म्हणाले की, अनुसूचित जातींमध्ये एकूण ५९ जातींचा समावेश असून उपवर्गीकरणाच्या विषयावर समाजात तणावाचे वातावरण निर्माण होत आहे. या प्रक्रियेमुळे समाजात अंतर्गत गटबाजी आणि फूट पडण्याची शक्यता असल्याने पक्षाचा प्राथमिक स्तरावर त्यास विरोध आहे. मात्र, भविष्यात उपवर्गीकरण अपरिहार्य ठरल्यास ते सरसकट न करता राष्ट्रीय जातीय जनगणनेतील अधिकृत लोकसंख्येच्या आकडेवारीच्या आधारेच करण्यात यावे. जनगणनेचे अंतिम अहवाल येण्यापूर्वी कोणताही निर्णय घेतल्यास अनेक वंचित समाजघटकांवर अन्याय होण्याची शक्यता असल्याने केंद्र आणि राज्य सरकारने जनगणनेनंतरच ही प्रक्रिया राबवावी, अशी मागणी त्यांनी केली.


### जेजुरी नगरपरिषद, जेजुरी

श्री. क्षेत्र जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे. 412303

संपर्क:-02115-253123 ई-मेल:-jn6396@gmail.com

जा.क्र. जेनपा./कावि/1702/2026 दिनांक.- 23/07/2026

#### जाहिर निविदा

| अ. क्र. | कामाचा तपशिल लेखा विभाग | टेंडर फी | बयाना रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | (लेखा विभाग) जेजुरी नगरपरिषदेच्या सप्टेंबर 2013 ते मार्च 2022 च्या इ.पी.एफ 7A सुनावणीसाठी सल्लागार म्हणून काम करणे. नगरपरिषदेची इ.पी.एफ 7A सुनावणीसाठी नगरपरिषद प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहणे, आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करुन सुनावणीस सादर करणे व अनुषंगिक इतर सर्व कामे करणे इत्यादी. | 500/- | 1000/- |

1. कोरे निविदा फॉर्म दिनांक 24/07/2026 ते 3/08/2026 या कालावधीत नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळतील.
2. वरीलप्रमाणे सीलबंद निविदा/दरपत्रक दिनांक 4/08/2026 रोजी सकाळी अकरा वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.
3. कामासंबंधी अधिक माहिती जेजुरी नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहवयास मिळेल.
4. अटीच्या व शर्तीच्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
5. आवश्यक कागदपत्रे इ.पी. फ सल्लागार म्हणून कमीत कमी 5 वर्षाचा अनुभव व शॉप ॲक्ट नोंदणी प्रमाणपत्र, पॅन (नगरपालिकेच्या इ.पी.एफ 7A कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य)
6. कमी दराच्या किंवा जास्त दराच्या एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न दता स्वीकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवण्यात आलेला आहे. त्याबाबत कारणे दिले जाणार नाही.

शिक्का

सही/-
(श्री. चारुदत्त इंगुले)
मुख्याधिकारी
जेजुरी नगरपरिषद


## स्वान फाउंडेशनचे कोषाध्यक्ष अक्षय खोब्रागडे यांना केंद्रीय राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांच्या हस्ते 'उत्कृष्ट व्यावसायिक पुरस्कार २०२६' प्रदान

पुणे (दै. संध्या) : सामाजिक, शैक्षणिक आणि कृषी-तंत्रज्ञान क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल स्वान फाउंडेशनचे कोषाध्यक्ष तथा नॉलेज नेस्ट (Knowledge Nest Initiative) उपक्रमाचे मार्गदर्शक अक्षय खोब्रागडे यांना 'उत्कृष्ट व्यावसायिक पुरस्कार २०२६' या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नवी दिल्ली येथे झालेल्या भव्य समारंभात भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण तसेच रसायने व खते मंत्रालयाच्या केंद्रीय राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांच्या हस्ते हा मानाचा पुरस्कार




प्रदान करण्यात आला. या पुरस्कार वितरण सोहळ्यास भारताचे माजी सरन्यायाधीश तथा राष्ट्रीय पुरस्कार समितीचे अध्यक्ष न्यायमूर्ती पी. सदाशिवम, महाराष्ट्र कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, कर्नाटक कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष डॉ. अशोक दलवाई, ॲग्रीकल्चर टुडे ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एम. जे. खान, हरियाणाचे माजी कृषिमंत्री ओ. पी. धनखड तसेच कॅनडा सरकारचे प्रतिनिधी एच. ई. ख्रिस्तोफर कुटर यांची प्रमुख उपस्थिती होती. चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर तालुक्यातील गिलबिली या दुर्गम आदिवासी गावातील आश्रमशाळेत शिक्षण घेतलेल्या अक्षय खोब्रागडे यांनी आपल्या जिद्द, परिश्रम आणि दूरदृष्टीच्या बळावर राष्ट्रीय स्तरावर वेगळी ओळख निर्माण केली आहे. सध्या ते सलाम किसान येथे मुख्य कार्यकारी अधिकारी (Chief Operating Officer - COO) म्हणून कार्यरत असून, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), ड्रोन तंत्रज्ञान, डिजिटल कृषी, सर्क्युलर इकॉनॉमी आणि ग्रामीण नवोपक्रमाच्या माध्यमातून देशातील लाखो शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत आहेत. याचबरोबर, स्वान फाउंडेशनचे कोषाध्यक्ष म्हणून ते ग्रामीण आणि आदिवासी विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या Knowledge Nest Initiative या उपक्रमाचे नेतृत्व व मार्गदर्शन करत आहेत. या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांना NASA (अमेरिका) आणि सिंगापूर येथे शैक्षणिक अभ्यासदौऱ्याची संधी उपलब्ध करून दिली जाते.


आदिवासी विकास विभाग — महाराष्ट्र शासन | महाराष्ट्र शासन | TRTI

### आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

२८ क्वीन्स गार्डन, पुणे ४११००१

**JEE (Mains & Advanced) and NEET प्रवेश परीक्षा पूर्व प्रशिक्षण तयारीसाठी अनिवासी प्रशिक्षण (ऑनलाईन व ऑफलाईन) देणे योजनेसाठी अनुसूचित जमातीच्या १००० उमेदवारांकडुन ऑनलाईन अर्ज मागविण्याबाबत**

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे कार्यालयाच्या वतीने महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या एकूण १००० उमेदवारांना इ. १० वी नंतर दोन वर्ष कालावधीकरिता ऑनलाईन स्वरुपात JEE (Mains & Advanced) and NEET प्रवेश परीक्षा पूर्व प्रशिक्षण (अनिवासी) देणे योजनेसाठी पात्र उमेदवारांकडुन ऑनलाईन स्वरुपात अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर योजनेचा सविस्तर तपशील, शासन निर्णय आवश्यक कागदपत्रे इ. बाबतच्या अधिक माहितीकरिता या कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळ https://trti.maharashtra.gov.in ला भेट देऊन या संकेत स्थळावर उपलब्ध करुन दिलेल्या लिंक वरुनच ऑनलाईन स्वरुपातच अर्ज करावेत. सदर प्रशिक्षणासाठी निर्धारित केलेल्या लक्षांक पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाले तर सामायिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test-CET) द्वारे गुणांकन पद्धतीने उमेदवारांची अंतिम निवड करण्यात येईल आणि निर्धारित केलेल्या लक्षांक पेक्षा कमी अर्ज प्राप्त झाले तर उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतानुसार उमेदवारांची अंतिम निवड करण्यात येईल.

अनुसूचित जमातीतील उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार व CET मधील प्राप्त गुणानुसार निवड करण्याचे अंतिम अधिकार आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडे राहतील.

- अर्ज करण्याचा सुरु दिनांक :- २३.०७.२०२६
- अर्ज करण्याचा अंतिम दिनांक :- ०७.०८.२०२६

सही/-
(निलेश सागर, भा.प्र.से)
आयुक्त

विमाका-पुणे-जाहि-९१-२०२६-२७



### पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.

Pune Metropolitan

नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, आकुर्डी, पुणे ४११०४४.

Email: ce2wssd@gmail.com

#### ई-निविदा नोटीस क्र. २३ सन-२०२६-२७

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे ई- निविदेद्वारे **"पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत पवना नदी प्रदूषण निवारण प्रकल्पासाठी पुलांवर सजावटीच्या स्टील वायर मेश कुंपणाची रचना, पुरवठा, बांधकाम उभारणीसाठी कंत्राटदाराची नियुक्ती करणे"** या कामासाठी निविदा मागविण्यात येत आहेत.

उपरोक्त निविदा दस्ताऐवज https://mahatenders.gov.in/ या संकेतस्थळावरून दि. २४/०७/२०२६ दुपारी ३:०० वा. पासून डाउनलोड करता येईल. सदर निविदा सादर करण्याची अंतिम तारीख दि. ३१/०७/२०२६ दुपारी ३:०० वा. पर्यंत आहे. कोणताही बदल https://mahatenders.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

सही/-
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विशेष प्रकल्प
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.

जा.क्र./प्रशासन/जाहिरात/२०२६/१७४९



महावितरण — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

### ई–निविदा सुचना

अधीक्षक अभियंता, महावितरण, गणेशखिंड मंडल यांचेकडून मान्यताप्राप्त नोंदणीकृत ठेकेदारांकडुन गणेशखिंड मंडळातील २२/११ केव्ही वीज उपकेंद्रांची प्रतिबंधात्मक देखभाल दुरुस्ती (Preventive Maintenance) कामे करण्यासाठी ई - निविदा मागविण्यात येते आहे. निविदा क्र. ०२/२०२६ - २०२७ असून निविदा मुल्य रु. १०० लाख इतकी आहे. सदर निविदा दि. २४.०७.२०२६ ते ०६.०८.२०२६ रात्री ११:५५ पर्यंत उपलब्ध आहे. निविदा भरण्याची अंतिम तारीख ०७.०८.२०२६ रात्री ११:५५ पर्यंत आहे. या निविदांबाबतची संपुर्ण माहितीकरीता संकेतस्थळ https://etender.mahadiscom.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

PRO/PZ/९०/२०२६-२७ अधीक्षक अभियंता, गणेशखिंड शहर मंडल, पुणे

## थोडक्यात पण महत्वाचे



### महापालिका भवनात अजितदादा पवार, लक्ष्मण जगताप यांची तैलचित्रे

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवड महापालिका भवनाच्या दर्शनी भागात तळमजल्यावर दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे तैलचित्र झळकणार आहे. तसेच, भाजपाचे दिवगंत आमदार लक्ष्मण जगताप यांचेही तैलचित्र लावले जाणार आहे. उमेद मान्यतेवर महापालिका भवनातील यशवंतराव चव्हाण सभागृहात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे तैलचित्र लावण्यात येणार आहे. त्यासह विविध कामांच्या खर्चाला स्थायी समितीने बुधवार (दि. २२) मान्यता दिली आहे. सभेच्या अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे होते. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच, दिवगंत आमदार लक्ष्मण जगताप यांचेही तैलचित्र महापालिकेच्या दर्शनी भागात लावण्यास सर्वसाधारण सभेने १३ मार्च २०२६ ला मंजुरी दिली आहे. तर, महापौर रवी लांडगे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे तैलचित्र सभागृहात लावण्याची विनंती १८ मे २०२६ च्या पत्राद्वारे केली आहे. त्याला अद्याप सर्वसाधारण सभेची मान्यता नाही. उमेद मान्यतेवर अहिल्यादेवी होळकर यांच्यासह अजित पवार व लक्ष्मण जगताप यांच्या तैलचित्र तयार करण्याच्या खर्चास स्थायी समितीने मान्यता दिली आहे. एका तैलचित्रासाठी ४ लाख २५ हजार रुपये खर्च आहे. महापालिकेच्या दर्शनी भागात माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचे तैलचित्र लावले आहे. ते तैलचित्र काढणारे चित्रकार सुनील शेगावकर यांनाच ते काम थेट पद्धतीने देण्यात आले आहे.

### पिंपरी-चिंचवड डीपी प्लानवर ५६ हजार हरकती; ३ ऑगस्टपासून सुनावणी

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सुधारित प्रारुप विकास योजना आराखड्यावर (डीपी प्लान) प्राप्त झालेल्या तब्बल 56 हजार 771 हरकती प्राप्त झाल्या आहेत. त्यावर आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात लवकरच सुनावणी घेण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिकेचा नगर रचना विभाग तेथे हलविण्यात येणार असून, मोठे व लहान असे दोन्ही नाट्यगृह तब्बल सहा महिने बंद ठेवण्यात येणार आहे. त्या काळात कोणालाही नाट्यगृह भाड्याने दिले जाणार नाही. महापालिकेकडून सुधारित प्रारुप विकास योजना आराखडा 15 मे 2025 ला प्रसिद्ध करण्यात आला. त्यावर 14 जुलै 2025 पर्यंत हरकती व सूचना स्वीकारण्यात आल्या. त्याला नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला. तब्बल 56 हजार 779 जणांनी हरकती नोंदवल्या आहेत. हरकतींवर सुनावणी घेण्यासाठी समिती स्थापन करण्यास महापालिका सर्वसाधारण सभेने 15 मे 2026 ला मान्यता दिली आहे. त्यामुळे लवकरच सुनावणी प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. सुनावणी सुरू करण्यापूर्वी हरकत नोंदवलेल्या नागरिकांना टपालाने नोटीस पाठवून सुनावणीचे ठिकाण, वेळ व दिनांक कळवण्यात येते; तसेच सुनावणीच्या वेळी हरकतदारांच्या उपस्थितीच्या नोंदी घेण्यासाठी याद्या तयार करण्याचे काम बाकी आहे. सुनावणीसाठी आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृह 1 जुलै ते 31 डिसेंबर असे सहा महिन्यांसाठी आरक्षित करण्यात आले आहे. त्या काळात नाट्यगृह कोणालाही भाड्याने दिले जाणार नाही. त्यामुळे तेथे कोणतेही कार्यक्रम होणार नाहीत. सुनावणी प्रक्रियेसाठी तेथे आवश्यक फर्निचर, टेबल व स्टेशनरी साहित्य उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत; तसेच नगररचना विभागाचे उपसंचालक, नगररचनाकार, सहाय्यक नगररचनाकार, कनिष्ठ आरेखक, वरिष्ठ लिपिक, कंत्राटी लिपिक, कंत्राटी तांत्रिक व्यक्तीची नेमणूक केली जाणार आहे. त्या दृष्टीने महापालिका प्रशासन तसेच, संबंधित विभागाकडून आवश्यक मनुष्यबळ व साहित्यसामग्री उपलब्ध करून देण्यात येत आहे.

### पिंपळे गुरवच्या महापालिका शाळा क्र. ५४ मध्ये पालकांसाठी शेडची प्रतीक्षा

**पिंपळे गुरव : दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवड महापालिका शिक्षणाच्या दर्जाबाबत मोठमोठे दावे करत असली तरी प्रत्यक्षात विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांकडे मात्र प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र पिंपळे गुरव येथील महापालिकेच्या शाळा क्रमांक ५४ मध्ये पहावयास मिळत आहे. महापालिका शाळेच्या आवारात असलेली विद्यार्थ्यांसाठीची खेळणीही तुटलेल्या अवस्थेत असून, त्याकडेही दुर्लक्ष झाल्याचे दिसत आहे. येथील प्रशालेमध्ये परिसरातील सर्वसामान्य कुटुंबांतील शेकडो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. दररोज सकाळी विद्यार्थ्यांना शाळेत सोडण्यासाठी आणि दुपारी शाळा सुटल्यानंतर त्यांना घरी घेऊन जाण्यासाठी पालक मोठ्या संख्येने शाळेच्या आवरात येतात. मात्र, त्यांच्यासाठी उभे राहण्यासाठी साधे शेडदेखील उपलब्ध नसल्याने पावसाळ्यात पालकांना अक्षरशः शाळा सुटेपर्यंत पावसात भिजत ताटकळत उभे रहावे लागत आहे. विशेष म्हणजे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान भावंडांना सोबत घेऊन येणाऱ्या पालकांची सर्वाधिक गैरसोय होत आहे. पाऊस सुरू झाल्यानंतर आसरा घेण्यासाठी कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे अनेकांना झाडाखाली किंवा इमारतीच्या कडेला उभे राहण्याची वेळ येते. त्यामुळे अपघाताची शक्यता निर्माण होत असून, पालकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

### स्मार्ट सिटी झाली, पण भाजी मंडईचा प्रश्न कायम; वाहतूककोंडीने नागरिक त्रस्त

**पिंपळे गुरव : दैनिक संध्या**

महापालिकेच्या 'स्मार्ट सिटी' योजनेअंतर्गत पिंपळे गुरव परिसराचा कायापालट करण्यात आला आहे. लाखो रुपये खर्च करून सुसज्ज असे सिमेंटचे रस्ते, पदपथ, सायकल ट्रॅक, ड्रेनेजलाईन, स्टॉर्म वॉटर लाईन, स्ट्रीट लाईट, उद्याने, अत्याधुनिक बसथांबे यासारख्या सुविधा येथे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मात्र, एवढा विकास होऊनही परिसरातील भाजी मंडईचा रखडलेला प्रश्न अद्याप सुटू शकलेला नाही. पालिकेकडे आरक्षित जागा उपलब्ध असूनही स्वतंत्र भाजी मंडई उभारली जात नसल्याने स्थानिक नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. पिंपळे गुरव येथील भगतसिंग चौक ते जवळकरनगर परिसरात सकाळ आणि संध्याकाळच्या वेळी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना भाजी विक्रेते मोठ्या प्रमाणात हातगाड्या आणि टेम्पो लावून बसतात. यामुळे मुख्य रस्ता अत्यंत अरुंद झाला असून, दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी होत आहे. सुदर्शननगर, जवळकरनगर, वैदूवस्ती, कल्पतरू, कृष्ण मंदिर आणि भगतसिंग चौक परिसरातील नागरिक याच बाजारपेठेत खरेदीसाठी येत असतात. त्यामुळे रस्ता अरुंद होत आहे. अनेकदा येथील रस्त्यावरून पायी चालणाऱ्या नागरिकांना जीव मुठीत धरून चालावे लागत आहे. त्यामुळे या भागात वाहतुकीच्या गोंधळामुळे अनेक लहान मोठे अपघातही घडून आले आहेत. या परिसरात अधिकृत गाळे खरेदी करून लाखो रुपये गुंतवून व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांना रस्त्यावरील अनधिकृत भाजी बाजारामुळे मोठा फटका बसत आहे. आम्ही कर भरून व्यवसाय करायचा आणि रस्त्यावरील कोंडीचा त्रास सहन करायचा का?, असा सवाल व्यापारी करीत आहेत.

# नागरी समस्या सोडविण्यावर भर द्या : अभिषेक बारणे

## स्वच्छता, आरोग्य, क्रीडा व पायाभूत सुविधांसह स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांची विविध विषयांना मंजुरी



"पिंपरी-चिंचवड शहराचा सर्वांगीण विकास, दर्जेदार नागरी सुविधा आणि पारदर्शक प्रशासन ही महापालिकेची सर्वोच्च प्राथमिकता आहे. स्वच्छता, आरोग्य, क्रीडा, जलनिःसारण, पर्यावरण आणि पायाभूत सुविधांशी संबंधित प्रस्तावांमुळे नागरिकांना अधिक परिणामकारक सेवा देण्यास मदत होईल. विकासकामांमध्ये सातत्य राखत प्रत्येक प्रकल्प वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असून नागरिकांच्या हिताला प्राधान्य देत आवश्यक निर्णय घेतले जात आहेत."

**• अभिषेक बारणे, स्थायी समिती सभापती**

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या महापालिका सभेत शहरातील क्रीडा सुविधा, स्वच्छता, आरोग्य, जलनिःसारण, सार्वजनिक सुविधा, माहिती-तंत्रज्ञान, स्मशानभूमी, रुग्णालय विकास तसेच विविध पायाभूत विकासकामांशी संबंधित महत्त्वाच्या प्रस्तावांवर चर्चा करण्यात आली. नागरिकांना अधिक दर्जेदार नागरी सेवा उपलब्ध करून देणे, सुरू असलेल्या विकासकामांना गती देणे आणि अत्यावश्यक सेवांमध्ये सातत्य राखणे या उद्देशाने विविध विषय सभेपुढे विचारार्थ ठेवण्यात आले.

सभेत मासुळकर कॉलनी येथील महापालिकेची व्यायामशाळा क्रीडा धोरणानुसार सेवाशुल्क तत्त्वावर ११ महिन्यांसाठी सिंहगर्जना मित्र मंडळ या संस्थेकडे चालविण्यास देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. तसेच सुधारित क्रीडा धोरण लागू झाल्यानंतर त्यातील सर्व अटी संबंधित संस्थेस बंधनकारक राहतील, अशी तरतूदही प्रस्तावात करण्यात आली.

स्वच्छ सर्वेक्षण अभियानांतर्गत नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी फ्लेक्स, बॅनर व स्टिकर्स तयार करण्यासाठी झालेल्या खर्चास मान्यता देण्याबाबत चर्चा झाली. तसेच स्वच्छ भारत अभियान, माझी वसुंधरा, वॉटर प्लस, सेवन स्टार रेटिंग, आरआरआर सेंटर्स, आयसीसीसी डॅशबोर्ड, नवी दिशा उपक्रम आणि झिरो वेस्ट स्लम मॉडेल यांसारख्या उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचावी यासाठी मराठी माहितीपट तयार करण्याच्या प्रस्तावावरही विचार करण्यात आला. अमरधाम स्मशानभूमीतील विद्युत व गॅस दाहिनीची देखभाल आणि संचालन अखंडित सुरू राहावे यासाठी विद्यमान कामास मुदतवाढ देणे, आवश्यक वाढीव खर्चास तसेच सुधारित प्रशासकीय मान्यतेस मंजुरी देण्याचा प्रस्ताव सभेसमोर ठेवण्यात आला.

ब क्षेत्रीय कार्यालयांतर्गत वेताळनगर, विजयनगर, मोरयानगर, एम.बी. कॅम्प किवळे, नागसेननगर आणि रमाबाईनगर परिसरातील जलनिःसारण व्यवस्था सक्षम करण्यासाठी प्राप्त निविदेस मंजुरी देऊन संबंधित ठेकेदारास काम देण्याबाबत विचार करण्यात आला.

इ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत भोसरी गावठाण परिसरातील सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांच्या स्वच्छता आणि देखभालीचे काम करणाऱ्या महिला बचत गटांना पुढील ११ महिन्यांसाठी मुदतवाढ देण्याचे प्रस्तावही सभेत चर्चेसाठी ठेवण्यात आले. सार्वजनिक स्वच्छता सेवा अखंडित ठेवण्याच्या दृष्टीने हे प्रस्ताव महत्त्वाचे असल्याचे नमूद करण्यात आले.

घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वाहन ट्रॅकिंग व व्यवस्थापन (VTM) प्रणालीचे काम नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सुरू ठेवण्यासाठी विद्यमान कंत्राटास मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. तसेच मुख्य लेखापरीक्षण विभागातील कर्मचाऱ्यांच्या रजा मंजुरीसंदर्भातील विषयांचाही सभेत विचार करण्यात आला. आरोग्य सुविधांचा विस्तार लक्षात घेऊन थेरगाव रुग्णालयाच्या चौथ्या मजल्यावरील उर्वरित बांधकामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्त करण्याचा प्रस्ताव चर्चेस आला. वाढत्या आरोग्यसेवा गरजा पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. महापालिकेच्या विविध विभागांसाठी प्रोजेक्टर व स्क्रीन खरेदीसाठी करण्यात आलेल्या निविदेअंतर्गत झालेल्या खर्चाचे अवलोकन सभेपुढे ठेवण्यात आले. रावेत येथील स्मशानभूमी प्रकल्पासंदर्भात राष्ट्रीय हरित लवाद (एनजीटी) आणि नीरी यांनी सुचविलेल्या निर्देशांनुसार आवश्यक बदल करून काम पूर्ण करण्यासाठी वास्तुविशारदाची थेट नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्तावही सभेत विचारार्थ ठेवण्यात आला. पर्यावरणीय निकषांचे पालन करून प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यक तांत्रिक सल्लागार नियुक्त करण्यावर या प्रस्तावात भर देण्यात आला.

## सुमन कल्याणपूर यांना मुजरा!

■ पिंपरी (दै. संध्या)

नेहमीच काहीतरी वेगळं, नावीन्यपूर्ण आणि प्रेक्षकांच्या मनाला स्पर्श करणारं सादर करणारी सोनी मराठीवरील 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' यावेळी एका अत्यंत आगळ्यावेगळ्या आणि हृदयस्पर्शी स्किटद्वारे ज्येष्ठ गायिका स्वरसम्राज्ञी सुमन कल्याणपूर यांना अभिवादन करणार आहे. समीर चौगुले यांनी लिहिलेल्या या विशेष स्किटमध्ये समीर चौगुले, ओंकार राऊत, नम्रता संभेराव, श्रमेश बेटकर आणि चेतना भट हे कलाकार सहभागी झाले आहेत. सुमनताईंच्या अजरामर गीतांची सुंदर वीण या स्किटमध्ये गुंफण्यात आली असून, त्यांच्या सुरेल कारकिर्दीला आणि समृद्ध संगीत वारशाला हा एक अनोखा सलाम आहे. 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'च्या इतिहासातील सर्वात मोठ्या आणि संस्मरणीय स्किट्सपैकी हे एक स्किट ठरणार आहे. हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीत हजारो गाण्यांनी रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या सुमन कल्याणपूर यांनी आपल्या मधुर, निर्मळ आणि भावपूर्ण आवाजाने अनेक दशकं संगीतविश्व समृद्ध केलं.

## नाशिक फाटा–खेड उन्नत कॉरिडॉरसाठी १७५ कोटींचा निधी

■ भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश

■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती लेखी मागणी

"नाशिक फाटा ते खेड उन्नत कॉरिडॉर हा केवळ एक रस्ता प्रकल्प नसून, पिंपरी-चिंचवड आणि पुणे परिसराच्या भविष्यातील वाहतूक व्यवस्थेला नवी दिशा देणारा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी आवश्यक निधी उपलब्ध व्हावा, यासाठी मी राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात लक्षवेधी सूचनेद्वारे शासनाचे लक्ष वेधले होते. तसेच, मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे लेखी पत्राद्वारे पाठपुरावा केला होता. त्यानंतर शासनाने पीएमआरडीएच्या भूसंपादनासाठी १७५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे, ही अत्यंत समाधानाची बाब आहे. पिंपरी-चिंचवड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी वाहतूक कोंडीमुक्त आणि गतिमान पायाभूत सुविधा निर्माण करणे ही आमची प्राथमिकता आहे. हा प्रकल्प वेळेत पूर्ण व्हावा आणि नागरिकांना त्याचा लाभ लवकरात लवकर मिळावा, यासाठी भविष्यातही शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा करणार आहोत.

**– महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

नाशिक फाटा ते खेड उन्नत कॉरिडॉर हा पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहरातील वाहतूक कोंडी सोडविणारा महत्त्वाकांक्षी प्रकल्प मानला जातो. या प्रकल्पामुळे नाशिक फाटा, भोसरी, मोशी, चऱ्होली परिसरासह पुणे-नाशिक महामार्गावरील वाहतुकीला मोठा दिलासा मिळणार असून, औद्योगिक व निवासी भागांतील प्रवास अधिक वेगवान आणि सुलभ होणार आहे. त्यामुळे भूसंपादनासाठी आवश्यक निधीची उपलब्धता हा प्रकल्पाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा आहे.

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवडमधील नाशिक फाटा ते खेड उन्नत कॉरिडॉर (Twin Elevated Corridor) प्रकल्पासाठी आवश्यक भूसंपादन प्रक्रियेला मोठा दिलासा मिळाला असून, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) हद्दीतील ४.१०४ हेक्टर जमिनीच्या भूसंपादनासाठी १७५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास (MSRDC) पत्र पाठविले आहे. या निर्णयामुळे रखडलेल्या भूसंपादन प्रक्रियेला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

नाशिक फाटा ते खेड उन्नत कॉरिडॉर प्रकल्पासाठी अतिरिक्त १४.१ हेक्टर भूसंपादन आवश्यक असून, यामध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील ३.८६९ हेक्टर, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीतील ६.१२८ हेक्टर आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील ४.१०४ हेक्टर जमिनीचा समावेश आहे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने (NHAI) या भूसंपादनासाठी एकूण ६०० कोटी रुपयांचे मूल्यांकन केले असून, संबंधित यंत्रणांना प्रत्येकी २०० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यास यापूर्वी मान्यता देण्यात आली होती.

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने २० जुलै २०२६ रोजी जारी केलेल्या पत्रानुसार, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे भूसंपादनासाठी वितरित करण्यात आलेल्या २०० कोटी रुपयांच्या अखर्चित निधीपैकी १७५ कोटी रुपयांची तरतूद नगरविकास विभागामार्फत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला उपलब्ध करून देण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यामुळे पीएमआरडीएच्या हद्दीतील भूसंपादन प्रक्रियेला गती मिळणार असून, प्रकल्पाच्या अंमलबजावणीतील एक महत्त्वाचा अडथळा दूर होणार आहे.

दरम्यान, भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी याबाबत राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात लक्षवेधी सूचना उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधले होते. तसेच, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे भूसंपादनासाठी आवश्यक निधी उपलब्ध करण्याबाबत पाठपुरावा केला होता. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर शासनाने हा निर्णय घेतल्याने प्रकल्पाच्या कामाला वेग येणार आहे. तसेच, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील भूसंपादनासाठीही निधी लवकरच मंजूर करण्यात येणार आहे.

## वाढदिवसानिमित्त पिंपरी-चिंचवड शहरात भव्य महारक्तदान शिबिर यशस्वी

४७२९ रक्तपिशव्यांचे संकलन : चिंचवड, पिंपरी आणि भोसरी विधानसभा निहाय ३२ प्रभागांतून ४३ ठिकाणी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

■ पिंपरी (दै. संध्या)




महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री मा.ना. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त, भारतीय जनता पार्टी पिंपरी-चिंचवड शहराच्या वतीने आणि पिं. चिं.मनपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या नेतृत्वाखाली बुधवार, दि. २२ जुलै २०२६ रोजी शहरात आयोजित करण्यात आलेल्या भव्य महारक्तदान शिबिराला नागरिकांचा अभूतपूर्व व उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिरामध्ये पिंपरी, चिंचवड आणि भोसरी या तिन्ही विधानसभा मतदारसंघांमधील ३२ प्रभागांतून तब्बल ४३ ठिकाणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

आमदार महेशदादा लांडगे, आमदार शंकरभाऊ जगताप, आमदार उमाताई खापरे, आमदार अमित गोरखे, माजी खासदार अमर साबळे, माजी आमदार अश्विनी ताई जगताप, महापौर रवी लांडगे, सभागृहनेता प्रशांत शितोळे, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, उपमहापौर शर्मिलाताई बाबर, संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे सरचिटणीस मधुकर बच्चे, वैशाली खाडे, विकास डोळस यांच्यासह 32 प्रभागातील नगरसेवक - नगरसेविका तसेच मंडल अध्यक्ष भाजपा पदाधिकारी यांनी महा रक्तदान शिबिर यशस्वी करण्यात पुढाकार घेतला.

या महाआरोग्य व रक्तदानाच्या उपक्रमांतर्गत शहरातील नागरिकांनी, युवकांनी आणि महिलांनी मोठ्या संख्येने पुढे येत रक्तदान केले. तिन्ही विधानसभा मतदारसंघांतील विविध प्रभागांमधील शाळा, मंगल कार्यालय, सभागृह, देवस्थाने आणि संपर्क कार्यालयांमध्ये उभारण्यात आलेल्या ४३ केंद्रांवर दिवसभर उत्साह पाहायला मिळाला. या सर्व केंद्रांवर मिळून एकूण ४,७२९ रक्तपिशव्यांचे विक्रमी संकलन करण्यात आले आहे.

रक्तदानासारख्या पवित्र सामाजिक उपक्रमात पिंपरी-चिंचवडच्या जनतेने दाखवलेले हे प्रेम आणि सामाजिक जाणीव वाखाणण्याजोगी आहे, असे गौरवोद्गार यावेळी काढण्यात आले. तसेच, या महारक्तदान शिबिराला यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतलेले सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक संस्था आणि उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन रक्तदान करणारे सर्व रक्तदाते नागरिक यांचे भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी मनःपूर्वक आभार मानले आहेत.

## रोजच्या वाहतूककोंडीने नागरिक हैराण

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड परिसरातील चाकण, मोशी, निघोज, कुरळी, आळंदी रस्ता या औद्योगिक पट्ट्यांमध्ये दररोज सकाळ, संध्याकाळी वाहतूककोंडीची समस्या निर्माण होत आहे. परिसरातील हजारो कंपन्यांमध्ये लाखों कामगार कार्यरत आहेत. या कामागारांची ने-आण करण्यासाठी कंपन्यांकडून बससुविधा दिली जाते, परंतु, बसचा रस्त्यावरील थांबा, चुकीच्या ठिकाणी पार्किंग आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन यामुळे या भागातील नागरिक, प्रवासी आणि इतर वाहनचालकांना वाहतूककोंडीचा मनस्ताप सहन करावा लागत आहे. या औद्योगिक परिसरात सकाळी साडेसहा ते नऊ आणि संध्याकाळी पाच ते साडेसात या वेळेत येथील रस्त्यांवर खासगी बसेसचा अक्षरश: ताबा असतो.

## पवना धरण ९२.५५ टक्के भरले; नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

■ पिंपरी (दै. संध्या)



पवना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात तसेच घाटमाथ्यावर सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पवना धरणातील पाणीसाठा झपाट्याने वाढत असून गुरुवारी सकाळी 11 वाजेपर्यंत धरण 92.55 टक्के भरले आहे. या पार्श्वभूमीवर पवना धरण प्रकल्प प्रशासनाने पवना नदीकाठच्या ग्रामस्थ, नागरिक, शेतकरी आणि लाभधारकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. धरण परिसरात सुरू असलेल्या पावसामुळे धरणात सातत्याने पाण्याची आवक होत आहे. धरणाची पाणीपातळी नियंत्रित ठेवण्यासाठी कोणत्याही क्षणी पवना नदीपात्रात कमी-अधिक प्रमाणात पाण्याचा विसर्ग करण्याची आवश्यकता निर्माण होऊ शकते. विसर्ग करण्यापूर्वी जलसंपदा विभागामार्फत आवश्यक माहिती आणि सूचना प्रसारित करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. सततच्या पर्जन्यवृष्टीमुळे नदी, नाले आणि ओढ्यांमधील पाणीपातळी अचानक वाढण्याची शक्यता असल्याने नदीकाठच्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच नदीपात्रात ठेवलेले साहित्य, शेतीची अवजारे, कृषी पंप आणि जनावरे तातडीने सुरक्षित ठिकाणी हलवावीत, असेही प्रशासनाने म्हटले आहे. दरम्यान, नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये आणि प्रशासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. स्थानिक जिल्हा व तालुका प्रशासनाला आवश्यक ते सहकार्य करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. पवना धरणातील पाणीसाठा 92 टक्क्यांहून अधिक झाल्याने नदीकाठच्या गावांमध्ये सतर्कतेचे वातावरण असून प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पुरग्रस्त वारकरी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

आळंदी : श्रीमंत माऊली प्रतिष्ठान व वारकरी संप्रदाय युवा मंच यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या 'वारी सत्कर्माची' या उपक्रमांतर्गत इंद्रायणी नदीच्या महापुरामुळे बाधित झालेल्या वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, जीवनावश्यक वस्तू तसेच किराणा मालाचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये आणि त्यांना संकटकाळात आधार मिळावा, या उद्देशाने हा सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला. या प्रसंगी ह.भ.प. प्रमोद महाराज जगताप, शिवसेना धर्मवीर आध्यात्मिक सेनेचे प्रदेशाध्यक्ष अक्षय महाराज भोसले, आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी माधव खांडेकर, शिवसेना उपनेत्या शितल म्हात्रे, युवासेनेचे सचिव राज सुर्वे, मुंबई महानगरपालिकेच्या नगरसेविका दीक्षा कारकर, माजी नगरसेवक हर्षद कारकर, अमर शहा, प्रिया आगणे, श्रीमंत माऊली प्रतिष्ठानचे अध्यक्ष विनित आंगणे, उमेश महाराज बागडे, वेदमूर्ती निखिल प्रसादे, कमलेश तांडेल तसेच वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यापक, वारकरी साधक आणि विद्यार्थी उपस्थित होते. ह.भ.प. प्रमोद महाराज जगताप म्हणाले, "वारकरी संप्रदायाने समाजसेवा आणि परोपकाराची परंपरा जपली आहे. पुरामुळे अडचणीत आलेल्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात देणे हीच खरी माऊलींची सेवा आहे. शिक्षणाचा प्रवास अखंड सुरू राहावा, यासाठी समाजाने अशा उपक्रमांना साथ द्यावी." अक्षय महाराज भोसले म्हणाले, "वारी ही समाजाला एकत्र आणणारी चळवळ आहे. भक्तीबरोबरच सेवाभावही वारकरी परंपरेचा आत्मा आहे. गरजू विद्यार्थ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून समाजाप्रती असलेले कर्तव्य पार पाडणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे." उपस्थित मान्यवरांनी अशा सेवाभावी उपक्रमांमुळे समाजात संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होत असल्याचे सांगितले. या मदतवाटपामुळे पुरग्रस्त विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाल्याची भावना वारकरी शिक्षण संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

### बाळासाहेब बढे यांच्या वाढदिवसानिमित्त शालोपयोगी साहित्य व खाऊचे वाटप

नारायणगाव :कांदळी गावचे राष्ट्रपती पुरस्कार विजेते माजी आदर्श सरपंच बाळासाहेब शिवाजीराव बढे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नगदवाडी ता. जुन्नर येथे सर्व विद्यार्थ्यांना शालोपयोगी शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नगदवाडी,न्यू इंग्लिश स्कूल नगदवाडी,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा १४ नंबर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुतारठिके या शाळेतील सर्व ४०० विद्यार्थ्यांना दर्जेदार वह्या व खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी बाळासाहेब बढे यांना शिरूर लोकसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष वैभव काळे,कांदळी गावचे माजी उपसरपंच सुनील गुंजाळ,शांताराम घाडगे,नारायण भोर,मुरलीधर गुंजाळ,रघुनाथ बढे,महेश बढे यांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी जुन्नर तालुका खरेदी विक्री संघाचे माजी अध्यक्ष अशोक बढे,बाजार समितीचे संचालक नबाजी घाडगे,कांदळी गावचे माजी उपसरपंच अनिल बापू भोर, ग्रामपंचायत सदस्य निलेश बढे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिनेश बढे,नगदवाडी सोसायटी चेअरमन पोपट बढे,दिनकर कुतळ,विश्वास बढे, शिवशंकर मांडे,गणेश भोर, संगीता बढे,अक्षदा जाधव,दयानंद बढे,अक्षय बढे, दिनेश घाडगे,मच्छिंद्र घाडगे, शांताराम बढे,अशोक जगताप, महेश बढे,चंद्रकांत बढे,दिनकर बढे,संपत बढे,सोमनाथ कुतळ,अथर्व बढे,संतोष बढे,बाबाजी बढे,नवनाथ नेंद्रे,जितेंद्र शिंदे,अभिजित बढे, नगदवाडी केंद्रप्रमुख वनिता हांडे,नगदवाडी केंद्र शाळेच्या मुख्याध्यापिका उज्ज्वला बोऱ्हाडे व सर्व शिक्षक,न्यू इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक डॉ.दिपक घाडगे व सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंगेश मेहेर यांनी केले.सूत्रसंचालन डॉ.दीपक घाडगे,सुनील गुंजाळ,अक्षय बढे यांनी केले तर उपस्थितांचे आभार बाळासाहेब बढे यांनी मानले. तसेच कांदळी गावातील ग्रामस्थांना माजी आदर्श सरपंच बाळासाहेब बढे यांच्या वाढदिवसानिमित्त आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या नागरिकांना कान,नाक,घसा,डोळे,बीपी अथवा शुगरचे आजार असतील त्यांना तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रिया,चष्मा,श्रवणयंत्रासाठी किंवा ऑपरेशनसाठी आर्थिक मदत करणार असल्याचे माजी सरपंच बाळासाहेब बढे यांनी जाहीर केले.गरजू व्यक्तींनी किंवा नातेवाईकांनी संपर्क साधण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

### गाडगे महाराज इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांची परीक्षांमध्ये उज्ज्वल कामगिरी

नारायणगाव : ओतूर येथील गाडगे महाराज इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये इयत्ता पहिलीतील विद्यार्थिनी वेदांगी सुनील डुकरे हिने अनेक स्पर्धा परीक्षांमध्ये अव्वल स्थान मिळवून विशेष कामगिरी केली आहे. वेदांगी डुकरे हिने राज्यस्तरीय मंथन परीक्षेत जिल्ह्यात पाचवा क्रमांक, लक्षवेध राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत राज्यात पाचवा क्रमांक, आय एम विनर परीक्षेत तालुक्यात तिसरा क्रमांक आणि भारत टॅलेंट सर्च परीक्षेत पहिला क्रमांक पटकावला आहे. तसेच ज्ञानोदय इंग्लिश ग्रामर परीक्षेत तिने परीक्षा केंद्रात प्रथम येण्याचा बहुमान मिळवला आहे. वेदांगी सोबतच इयत्ता पाचवीतील प्रणिक निलेश कदम आणि इयत्ता आठवीतील देवर्ष प्रशांत फल्ले यांनीही विविध स्पर्धा परीक्षांमध्ये घवघवीत यश मिळवून विद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा आणि त्यांच्या मनातील स्पर्धा परीक्षांची भीती कमी व्हावी, यासाठी शाळेत विद्यार्थ्यांना नियमित मार्गदर्शन केले जाते, अशी माहिती मुख्याध्यापिका स्वाती सोनावणे यांनी दिली. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापिका स्वाती सोनावणे, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य नितीन पाटील आणि विद्यालयाच्या शिक्षकांनी विशेष अभिनंदन व कौतुक केले आहे.

### नाणेघाटात 'नानाचा अंगठा'वरून दरीत पडून 22 वर्षीय तरुणाचा मृत्यू

नारायणगाव : नाणेघाट परिसरात 'नानाचा अंगठा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या धोकादायक कड्यावर फिरण्यासाठी गेलेल्या चार मित्रांपैकी एका २२ वर्षीय तरुणाचा पाय घसरून खोल दरीत पडल्याने मृत्यू झाला. दोन दिवस शोधमोहीम राबविल्यानंतर मंगळवारी सकाळी मुरबाड येथील सह्यगिरी रेस्क्यू टीमने त्याचा मृतदेह दरीतून बाहेर काढला. दत्ता लोंढे वय २२, रा. पारगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. लोंढे हा मित्रांसह नाणेघाट परिसरात पर्यटनासाठी गेला होता. डोंगर चढत असताना अर्ध्या वाटेत लोंढे याने परत जात असल्याचे मित्रांना सांगितले. मात्र, बराच वेळ उलटूनही तो पार्किंगपर्यंत पोहोचला नाही. त्यामुळे मित्रांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने त्याचा शोध घेतला. परिसरात शोधाशोध करूनही तो न सापडल्याने जुन्नर पोलिसांना माहिती देण्यात आली. या घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक संकेत चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली जुन्नर पोलिसांचे पथक, आपत्ती व्यवस्थापन विभाग, वन विभाग आणि रेस्क्यू टीमने शोधमोहीम सुरू केली.



# छायाचित्र प्रदर्शनातून दादांच्या आठवणींना उजाळा

पुणे (दैनिक संध्या) : महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री दिवंगत नेते स्व.अजित दादा पवार यांच्या जयंती निमित्त छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी फोटोमधून लहानपण, तारुण्य आणि कुटुंबात रमलेले दादा, कामाच्या व्यापात सभा, कार्यक्रमात आणि वारकऱ्यात रमलेले दादा पाहून आठवणींना उजाळा मिळाला.

अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात डिपार्टमेंट ऑफ मिडिया अँड कम्युनिकेशन स्टडीज तर्फे आयोजित प्रदर्शनाचे संस्थेचे सचिव मिलिंद शाह वाघोलीकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर यांनी या सर्व उपक्रमास शुभेच्छा दिल्या. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अविनाश जगताप, उपप्राचार्य डॉ.योगिनी मुळे, डॉ. सचिन गाडेकर, डॉ. अरुण मगर, रजिस्ट्रार अभिनंदन शहा, विभागप्रमुख प्रा. राहुल चौधरी आदी मान्यवर उपस्थिती होते.

छायाचित्र प्रदर्शनात दादांच्या जीवनातील महत्वाच्या घटना, प्रसंगावर आधारित शंभर पेक्षा जास्त छायाचित्र लावण्यात आले होते. त्यामध्ये लहानपणी बहीण- भावंडासह, तरुणपण, विवाह सोहळा, काका शरद पवार, बहीण सुप्रिया पवार, पत्नी सुनेत्राताई पवार, आई , भाऊ, बहिणी, मुले आदी कुटुंबीयांसमवेत असलेले दादा तसेच विविध सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक, धार्मिक उपक्रम, राजकीय कारकिर्दीची सुरुवात, विविध निवडणूका, बारामतीच्या विकासकामांचा आढावा घेत असतानाचे फोटो, तसेच राजकीय सभा, रॅली , भाषणात व्यस्त असलेले दादा त्यांच्या जन्मदिनी नागरिकांना पहायला मिळाले. प्रदर्शन पाहिल्यानंतर विद्यार्थी, नागरिकांच्या मनात दादांच्या आठवणी पुन्हा जाग्या झाल्या. प्रदर्शनाला दिवसभर विद्यार्थी, नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद देत गर्दी केली होती.

## हलगीवाद्याच्या कलेने हलगी सम्राट केरबा पाटलांची ओळख

नारायणगाव (दै. संध्या)

राज्य पुरस्कार प्राप्त हलगी सम्राट केरबा पाटील संस्थेच्या वतीने हलगी सम्राट केरबा पाटील यांच्या 19 साव्या पुण्यस्मरणाचे आयोजन ग्रामपंचायत वारुळवाडी तालुका जुन्नर येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते सुरज वाजगे म्हणाले, "कला ही माणसाने आत्मसात केली पाहिजे'. 'कलेमुळेच माणसाची खरी ओळख होते'! केरबा पाटलांची हलगी आजही युट्युबच्या माध्यमातून लोकांच्या नजरेसमोर आहे. त्यांचे हलगीवाद्य हीच त्यांची खऱ्या अर्थाने महाराष्ट्रात ओळख झाली आहे. यावेळी वारुळवाडीगावचे सरपंच विनायक भुजबळ म्हणाले,"लोककला ही आपली संस्कृती आहे"! ती लोक संस्कृती जपण्याचे आणि संवर्धन करण्याचे काम अनेक दिग्गज महान कलाकारांनी केले. त्यापैकी केरबा पाटलांसारखे एक होते. अनेक कलावंतांनी महाराष्ट्रात कलेची जोपासणे केली. या कार्यक्रमाच्या निमित्ताने मुंबईचे सामाजिक कार्यकर्ते किशोर आल्हाट, राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन योजना महाराष्ट्र राज्य समितीचे सदस्य प्रदीप कुलकर्णी,

प्रसिद्ध ताशा सम्राट निसार पटेल, कवी नितीन शेलार, कवयित्री सौ. ज्योती शेलार,पत्रकार जयेश खांडगे, ग्रामविकास अधिकारी सचिन उंडे साहेब,ज्येष्ठ तमाशा हलगी सम्राट सखाराम आल्हाट ,संगीतकार संजय फल्ले, प्रसिद्ध गायिका शारदा नारायणगावकर व इतर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भाजपा शिरूर शहर महिला आघाडीच्या अध्यक्षा प्रिया बिरादार यांच्या पाठपुराव्याला यश

शिरूर (दै. संध्या)




शिरूर पोस्ट ऑफिसमधील आधार सेवा केंद्र २०२३ पासून बंद असल्याने नागरिकांना आधार कार्ड नोंदणी, अद्ययावतीकरण व इतर सेवांसाठी खासगी केंद्रांवर जास्त शुल्क भरून कामे करावी लागत होती. याबाबत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी येत असल्याने भाजपा शिरूर शहर महिला आघाडीच्या अध्यक्षा प्रिया बिरादार यांनी सातत्याने पाठपुरावा करत तहसील कार्यालय तसेच पोस्ट विभागाकडे अनेक वेळा निवेदने देऊन आधार सेवा केंद्र सुरू करण्याची मागणी केली होती. मात्र, त्यानंतरही कोणतीही ठोस कार्यवाही झाली नव्हती. दरम्यान, बारामती विभागाचे अधीक्षक डाकघर केतन डी. शित्रे हे शिरूर दौऱ्यावर आले असताना प्रिया बिरादार यांनी महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांसह पोस्ट ऑफिसमधील प्रत्यक्ष परिस्थिती फोटो व व्हिडिओद्वारे त्यांच्या निदर्शनास आणून दिली. नागरिकांची होत असलेली गैरसोय स्पष्ट करत तातडीने केंद्र सुरू करण्याची मागणी करण्यात आली.

या घटनेची तात्काळ दखल घेत अधीक्षक केतन डी. शित्रे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आधार सेवा केंद्र त्वरित सुरू करण्याचे आदेश दिले. त्यांच्या उपस्थितीतच फलक लावून आधार सेवा केंद्र पुन्हा सुरू करण्यात आले. यामुळे आता शिरूर शहरातील नागरिकांना शासनाने निश्चित केलेल्या अधिकृत दरात नवीन आधार नोंदणी, आधारमधील नाव, पत्ता, जन्मतारीख, मोबाईल क्रमांक आदी तपशीलांमध्ये दुरुस्ती, बायोमेट्रिक अद्ययावत करणे तसेच UIDAI मान्यताप्राप्त इतर आधार सेवा शिरूर पोस्ट ऑफिसमध्येच उपलब्ध होणार आहेत. आधार अद्ययावतीकरणासाठी आवश्यक कागदपत्रांसह नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन अधीक्षक केतन डी. शित्रे यांनी केले आहे.

## नारायणगाव मीना नदीमध्ये जलसमाधी आंदोलन

नारायणगाव (दै. संध्या)



सोमवार दि.२७/७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता आंदोलन पिंपळगाव तर्फे नारायणगांव येथील दक्षिण व उत्तर काठच्या जमिनी मीना नदीच्या प्रवाहामध्ये संपूर्ण वाहून गेल्याने शेतकऱ्यांनी नुकसान भरपाईची मागणी केली आहे. श्री. प्रभाकर बांगर पुणे जिल्हाध्यक्ष स्वाभिमानी शेतकरी संघटना यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलन होणार आहे. ४/५/६/७/८ जुलै २०२६ या कालावधीत प्रचंड मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली होती. वडज धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडल्यामुळे नदीकाठच्या गटामधील आमच्या हिश्याचे संपूर्ण क्षेत्र नदीच्या प्रवाहात वाहून गेले आहे. त्याची संपूर्ण नुकसान भरपाई मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. मागण्या खालील प्रमाणे- पूरग्रस्तांना 'महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम' अंतर्गत जमिनीचा मोबदला, पर्यायी जमीन शासकीय नोकरीत आरक्षण आणि रोख अनुदानाचा लाभ मिळतो. पूरग्रस्तांना मिळणारा मोबदला मिळून देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. १.)सदर गट नंबरचा नदीच्या बाजूने दगडी अस्तरीकरण करण्यात यावे. २)जमिनीचा आर्थिक मोबदला: संपादित केलेल्या शेतजमिनीच्या बदल्यात 'भूसंपादन कायदा २०१३' नुसार बाजारभावाप्रमाणे रोख मोबदला मिळतो.ग्रामीण भागात बाजारभावाच्या ३ ते ४ पट देण्याची तरतूद आहे. ३) पर्यायी जमीन/: जमिनीव्यतिरिक्त शेतीसाठी पर्यायी जमीन ४)शासकीय नोकरीत आरक्षण, शासकीय/निमशासकीय नोकऱ्यांमध्ये ५ टक्के आरक्षण मिळते.कुटुंबातील एका पात्र सदस्याला (नोंदणीकृत प्रकल्पग्रस्त दाखल्यानुसार) नोकरीत प्राधान्य दिले जाते.

वरील मागण्यांचे निवेदन श्री.शरददादा सोनवणे आमदार जुन्नर,कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग नारायणगाव, तहसीलदार जुन्नर,नारायणगाव पोलीस स्टेशन भूमी अभिलेख जुन्नर यांना श्री.प्रमोद खांडगे पाटील,श्री.के.डी.सरोदे, श्री. संजय चव्हाण,सौ.वंदना वाघचौरे यांनी दिले आहे.

## जेजुरी नगरपरिषदेच्या समोर भाजपच्या शिंदे उपोषण सुरु

जेजुरी : जेजुरी शहरातील नंदी चौकात एका माजी नगरसेवकाने केलेल्या बेकायदेशीर बांधकामाविरोधात वारंवार तक्रार करूनही पालिका प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने पुणे जिल्हा भाजपाच्या उपाध्यक्षा अलका शिंदे यांनी जेजुरी नगरपरिषदेच्या समोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

जेजुरी शहरातील नंदी चौका नजीक एका नगरसेवकाने बेकायदेशीरपणे इमारतीचे काम करून या इमारतीचा वापर सुरू केला आहे. याबाबत गेली सहा महिने वारंवार तक्रार देऊन ही जेजुरी नगरपरिषद प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केले आहे. आपल्या मागणीला न्याय मिळून संबंधितावर कारवाई व्हावी या मागणीसाठी भाजपच्या जिल्हा उपाध्यक्ष अलका शिंदे यांनी मंगळवार दिनांक 21 रोजी आमरण उपोषण सुरू केले आहे.

या उपोषणाला भाजपचे नगरसेवक गणेश डोंबे, प्रियंका देशमुख,माजी नगरसेवक हेमंत सोनवणे, अजिंक्य देशमुख, अमोल सातभाई भाजपाचे पदाधिकारी प्रसाद अत्रे,विक्रम माळवदकर, विशाल बारसुडे, हरिभाऊ रत्नपारखी, कुमार गावडे, अनिल पोकळे, राहुल मंघनानी, संतोष तोडकर, आदी उपस्थित होते.

दरम्यान जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन त्यांच्या मागणीविषयक प्रश्नांची माहिती घेऊन चर्चा केली.

अलका शिंदे यांनी केलेल्या तक्रारी बाबत संबंधित व्यक्तीला नोटिसा दिल्या आहेत.तसेच याबाबत अलका शिंदे यांना वेळोवेळी लेखी माहिती दिली आहे.

## शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेसंदर्भात सहविचार सभा उत्साहात संपन्न

जेजुरी (दैनिक संध्या) : श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जेजुरी येथे शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षा–2026 (एलिमेंटरी व इंटरमिजिएट) यशस्वीपणे आयोजित करण्याच्या अनुषंगाने सहविचार सभा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

यावेळी पुणे जिल्हा कला शिक्षक संघाचे विभागीय उपाध्यक्ष अशोक साबळे, महात्मा ज्योतिराव फुले विद्यालय, शिवरीचे मुख्याध्यापक संजय गोसावी, मावडी पिंपरी विद्यालयाचे गोरक्षनाथ भोंग, दादा जाधवराव विद्यालय, जेजुरीच्या स्वाती कामथे, वाघेश्वरी माध्यमिक विद्यालय, पिंगोरीच्या विद्या शिंदे, न्यू इंग्लिश स्कूल, मांडकीचे अमोल थोरात, न्यू इंग्लिश स्कूल, जवळार्जुनचे मयुर घोंगटे तसेच जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलच्या भावना देवकर व जान्हवी कांबळे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुरंदर तालुका कला शिक्षक संघाचे अध्यक्ष योगेश घोरपडे यांनी केले. त्यांनी शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेसाठी सहभागी शाळांचे ऑनलाइन रजिस्ट्रेशन, पासवर्ड निर्मिती, विद्यार्थ्यांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच चित्रकला ग्रेड परीक्षेमुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना मिळते आणि त्यांच्या कलागुणांना व्यापक व्यासपीठ उपलब्ध होते, असे सांगत परीक्षेच्या नियोजनामागील उद्देश स्पष्ट केला.



अध्यक्षीय मार्गदर्शन करताना प्राचार्य नंदकुमार सागर म्हणाले की, "शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला दिशा देणारी आणि त्यांच्या कलात्मक गुणवत्तेला व्यापक स्तरावर ओळख मिळवून देणारी महत्त्वाची परीक्षा आहे. परीक्षेचे आयोजन करताना शासनाने निर्धारित केलेल्या सर्व नियमांचे काटेकोर पालन करणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांना शांत, सकारात्मक आणि प्रेरणादायी वातावरण उपलब्ध करून देत पारदर्शक, शिस्तबद्ध व गुणवत्तापूर्ण परीक्षा प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे. सर्व शिक्षकांनी समन्वय, शिस्त आणि प्रभावी नियोजनाच्या बळावर ही परीक्षा यशस्वी करण्यासाठी सक्रिय योगदान द्यावे." सभेमध्ये परीक्षेच्या नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. परीक्षेची पूर्वतयारी, परीक्षा केंद्रावरील आवश्यक सुविधा, विद्यार्थ्यांसाठी लागणारे साहित्य, आसनव्यवस्था, वेळापत्रक, स्वयंसेवकांचे नियोजन तसेच शासनाच्या सर्व नियमांचे पालन करून परीक्षा सुरळीत व पारदर्शकपणे पार पाडण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी परीक्षेसाठी सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. तसेच पालक, शिक्षक आणि चित्रकला क्षेत्रातील मान्यवरांच्या सहकार्याने परीक्षा यशस्वी करण्याचे आवाहन करण्यात आले.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना सर्व सुविधा वेळेत उपलब्ध करून द्याव्यात



■ मुंबई (दै. संध्या)

आदिवासी विकास विभागांतर्गत येणाऱ्या आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना गणवेशासह सर्व आवश्यक सोयी-सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्यात याव्यात. विद्यार्थ्यांच्या शिक्षणात कोणताही अडथळा येणार नाही, याची संबंधित अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी दिले. आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांच्या अध्यक्षतेखाली अमरावती विभागातील आश्रमशाळा व वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या सोयी सुविधाबाबत आढावा घेण्यात आला. या बैठकीस आमदार राजेश पाडवी तसेच दूरदृश्य प्रणाली द्वारे आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, आदिवासी विकास

मंत्री डॉ. अशोक वुईके

विभागाच्या आयुक्त लिना बनसोड, अमरावती विभागाचे अपर आयुक्त संदीप गोलाईत तसेच प्रकल्प अधिकारी, मुख्याध्यापक, अधीक्षक, गृहपाल तसेच संबंधित विभागातील अधिकारी सहभागी झाले होते.

आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके म्हणाले, विद्यार्थ्यांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने स्वच्छ परिसर, शुद्ध पिण्याचे पाणी, सकस व दर्जेदार भोजन उपलब्ध करून देण्यास प्राधान्य द्यावे. स्वच्छतेच्या अनुषंगाने व तसेच इतर बाबींबाबत प्रकल्प अधिकाऱ्यांनी मुख्याध्यापकांची बैठक घेऊन आवश्यक नियोजन करावे. प्रत्येक आश्रमशाळेला प्रकल्प अधिकाऱ्यांनी नियमित भेटी देऊन प्रत्यक्ष पाहणी करावी आणि विद्यार्थ्यांच्या अडचणी तातडीने सोडवाव्यात. विद्यार्थ्यांना वितरित करण्यात येणाऱ्या साहित्याचा संपूर्ण तपशील गुगल शीट वर अद्ययावत भरावा, तसेच तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून कामकाज करावे.

आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांच्या यशोगाथा, शैक्षणिक, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी तसेच विविध उपक्रमांची प्रभावी प्रसिद्धी करण्याच्या सूचनाही त्यांनी सकारात्मक काम समाजापर्यंत पोहोचल्यास आदिवासी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळेल, असे त्यांनी नमूद केले. तसेच राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण योजनेच्या अंमलबजावणीचाही आढावा यावेळी घेण्यात आला.

## ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरा’त नागरिकांनी घेतला विविध योजनांचा लाभ

■ मुंबई (दै. संध्या)

राज्य शासनाच्या लोकाभिमुख उपक्रमांना अधिक प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर’ वडाळा येथे आयोजित करण्यात आले. शासनाच्या विविध योजनांची माहिती, महसूल विभागाशी संबंधित सेवांचा लाभ तसेच नागरिकांच्या विविध समस्यांचे तातडीने निराकरण यावेळी करण्यात आले. यावेळी आमदार कालिदास कोळंबकर, आमदार डॉ. मनिषा कायंदे, मुंबई शहर जिल्ह्याचे अपर जिल्हाधिकारी बप्पासाहेब थोरात उपस्थित होते. या अभियानामुळे सामान्य नागरिकांचा वेळ, पैसा आणि मानसिक त्रास कमी होऊन महसूल प्रशासन ‘वेगवान आणि पारदर्शक सेवा’ देण्याच्या दिशेने पुढे जात असल्याचा विश्वास आमदार कालिदास कोळंबकर यांनी व्यक्त केला. डिजिटल सेवा, महसूल संहितेतील नव्या तरतुदी आणि विविध शासकीय योजना यांबाबत जनजागृती होत असल्यामुळे शासन आणि नागरिक यांच्यातील विश्वास अधिक



मजबूत होईल, अशी अपेक्षा आमदार डॉ. मनिषा कायंदे यांनी व्यक्त केली. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या सेवा पोहोचवण्याचा प्रयत्न या शिबिराच्या माध्यमातून केला जात असल्याचे अपर जिल्हाधिकारी बप्पासाहेब थोरात यांनी प्रास्ताविकात सांगितले. शिबिरात मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग नोंदवत महसूल विभागाच्या विविध सेवांचा लाभ घेतला. संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नागरिकांच्या अर्जांची तत्परतेने छाननी करून आवश्यक मार्गदर्शन केले. शिबिरामध्ये १९ शासकीय कार्यालयांनी स्टॉल लावले होते. या विभागांनी नागरिकांना विविध शासकीय योजनांची माहिती, अर्ज प्रक्रिया आणि मार्गदर्शन उपलब्ध करून दिले.

## बीएचएमएस आणि सीसीएमपी पात्र डॉक्टरांची नोंदणी प्रक्रिया लवकरच सुरू होणार : मंत्री हसन मुश्रीफ

■ मुंबई (दै. संध्या)

बीएचएमएस आणि सीसीएमपी पात्र डॉक्टरांच्या नोंदणी प्रक्रियेसंदर्भातील शासन निर्णय आणि संबंधित कायदेशीर तरतुदींचे पालन करत नोंदणी प्रक्रिया लवकरच सुरू करण्याचे निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले.

बीएचएमएस आणि सीसीएमपी पात्र डॉक्टरांच्या नोंदणी प्रक्रियेसंदर्भातील विविध प्रलंबित बाबींचा आढावा घेण्यासाठी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली.

यावेळी वैद्यकीय शिक्षण व संशोधन आयुक्त अनिल भंडारी, आयुष संचालनालयाच्या संचालक सापळे, मुख्य प्रशासकीय अधिकारी हेमंत पवार, महाराष्ट्र होमिओपॅथी परिषदेचे प्रशासक डॉ. बाहुबली शहा, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचे प्रतिनिधी, इंटिग्रेटेड डॉक्टर्स असोसिएशनचे डॉ. अमोल आंबेकर तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. इंडियन मेडिकल असोसिएशन



यांनी मांडलेल्या सूचनांनुसार नोंदणी प्रक्रिया स्वतंत्र नोंदणी अभिलेखात करण्याबाबत तसेच बीएचएमएस, आणि सीसीएमपी. पात्र डॉक्टरांना कायद्यानुसार कोणत्या उपचारपद्धतींची परवानगी राहील, याबाबत स्पष्टता करण्यात आली. कायदेशीर बाबी, शासनाने वेळोवेळी यापूर्वी दिलेले निकष आणि लागू नियमांचा विचार करून नोंदणी प्रक्रियेची पुढील कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले. नोंदणी प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुलभ आणि नियमबद्ध करण्यासाठी मानक कार्यपद्धती स्पष्ट करण्यात आली. अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या पात्र डॉक्टरांच्या नोंदणीबाबत कायदेशीर आणि प्रशासकीय प्रक्रियेला गती देण्यावर बैठकीत भर देण्यात आला.

येत्या दोन दिवसांत तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून नोंदणी प्रक्रिया लवकरात लवकर नियमितपणे सुरू करावी.संबंधित सर्व विभागांमध्ये समन्वय साधून नोंदणी प्रक्रिया अधिक परिणामकारक, पारदर्शक आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

## सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे २८ जुलै रोजी ‘अभंग ते आधुनिक’ कार्यक्रम




■ मुंबई (दै. संध्या)

सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने ‘अभंग ते आधुनिक’ या विशेष सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार, 28 जुलै 2026 रोजी रात्री 8.30 वाजता पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, रवींद्र नाट्य मंदिर लघु नाट्यगृह, प्रभादेवी, मुंबई येथे हा कार्यक्रम सादर होणार आहे. ‘अभंग ते आधुनिक’ हा संतवाणीपासून आधुनिक मराठी गीतांपर्यंतच्या

### संतवाणी आणि आधुनिक मराठी गीतांचा सुरेल संवाद

मराठी संगीताचा सुरेल प्रवास उलगडणारा विशेष सांगीतिक कार्यक्रम आहे. अभंग, संतवाणी आणि मराठी संगीतपरंपरेतील विविध प्रवाहांचा आधुनिक मराठी गीतांशी सुरेल संवाद या कार्यक्रमातून साधला जाणार आहे. परंपरा आणि आधुनिकता यांचा कलात्मक संगम घडवून आणणारा हा कार्यक्रम रसिकांसाठी एक वेगळा आणि संस्मरणीय सांगीतिक अनुभव ठरणार आहे.

या कार्यक्रमात गायक नचिकेत देसाई, केतकी भावे-जोशी आणि धनश्री देशपांडे यांच्या सुमधुर आवाजातून संतवाणीपासून आधुनिक मराठी गीतांपर्यंतच्या विविध रचनांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. डॉ. समीरा गुजर-जोशी या कार्यक्रमात सुसंवाद साधणार आहेत. विनय चेऊलकर, अक्षय कावळे, विजय तांबे, प्रभाकर मोसमकर, मयुरेश शर्लेकर आणि जयंता बगाडे हे वादक कलाकार साथसंगत करणार आहेत. कार्यक्रमाचे संयोजन ‘स्वरवंती क्रिएशन्स’ यांचे असून, ध्वनी संयोजन प्रतीक पराडकर यांचे आहे.

मराठी संगीतपरंपरेला संतवाणी, अभंग आणि भक्तिसंगीताचा समृद्ध वारसा लाभला आहे. या परंपरेतून विकसित झालेल्या मराठी संगीताने काळानुरूप विविध रूपे धारण केली असून, आधुनिक मराठी गीतांनी या सांगीतिक प्रवाहाला अधिक व्यापक आणि समृद्ध केले आहे. संतपरंपरेतील अभंगवाणीपासून आधुनिक मराठी गीतांपर्यंतचा हा समृद्ध सांगीतिक प्रवास रसिकांसमोर सादर करण्याच्या उद्देशाने ‘ते अभंग आधुनिक’ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा सांस्कृतिक उपक्रम सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे जतन, संवर्धन आणि प्रसार करण्याबरोबरच संतपरंपरा, मराठी संगीत आणि आधुनिक सांगीतिक अभिव्यक्ती यांचा परिचय अधिकाधिक रसिकांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येत आहे. या कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य असून, मुंबई व परिसरातील संगीतप्रेमी, कला रसिक, मराठी संगीताचे अभ्यासक तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सांगीतिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांनी केले आहे.

## राज्यातील १.७० कोटी कुटुंबांसाठी क्यूआर कोड आधारित स्मार्ट शिधापत्रिका

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील नागरिकांना अधिक सुलभ, सुरक्षित व आधुनिक स्वरूपातील शिधापत्रिका उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने क्यूआर कोड आधारित स्मार्ट शिधापत्रिका उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रत्येक पात्र नागरिकांपर्यंत क्यूआर कोड आधारित स्मार्ट शिधापत्रिका प्रतिकृतीचे अनावरण अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्याहस्ते येवला, (जि. नाशिक) येथील कार्यक्रमात करण्यात आले. या मोहिमेअंतर्गत राज्यातील सुमारे १.७० कोटी कुटुंबांना क्यूआर कोड आधारित स्मार्ट शिधापत्रिका वितरित करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या माध्यमातून शिधापत्रिका व्यवस्थेत अधिक सुलभता, पारदर्शकता आणि कार्यक्षमता आणण्यास मदत होणार असून, नागरिकांना शासकीय अन्नधान्य वितरण व्यवस्थेतील सेवांचा अधिक सोयीस्करपणे लाभ घेता येणार आहे. स्मार्ट शिधापत्रिका प्रकल्प राबविण्यासाठी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुढाकार घेतला होता. जुन्या कागदी शिधापत्रिकांमुळे राज्यातील गोरगरीब व सर्वसामान्य नागरिकांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन त्यांना क्यूआर कोड आधारित स्मार्ट शिधापत्रिका उपलब्ध करून देण्याबाबत




■ ‘स्वर्गीय अजितदादा पवार लोककल्याण स्मार्ट शिधापत्रिका वितरण मोहिम’

त्यांनी निर्देश दिले होते. त्यांच्या या संकल्पनेनुसार राज्यातील नागरिकांना स्मार्ट शिधापत्रिका उपलब्ध करून देण्यासाठी ‘स्वर्गीय अजितदादा पवार लोककल्याण स्मार्ट शिधापत्रिका वितरण मोहिम’ पुढील तीन वर्षांच्या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पांतर्गत ‘राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना (एएवाय व पीएचएच) तसेच एपीएल-शेतकरी योजनेतील शिधापत्रिकाधारकांना क्यूआर कोड आधारित स्मार्ट शिधापत्रिका निःशुल्क उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. स्मार्ट शिधापत्रिकेमुळे शिधापत्रिकेची हाताळणी सुलभ होण्याबरोबरच लाभार्थ्यांची माहिती अधिक सुरक्षित व अद्ययावत पद्धतीने उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. स्मार्ट शिधापत्रिका प्रकल्पाची प्रायोगिक तत्त्वावर नंदुरबार व सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

# ‘चरणसेवा’ने जपले लाखो वारकऱ्यांचे आरोग्य

### ४.९६ लाखांहून अधिक वारकऱ्यांना लाभ

■ मुंबई (दै. संध्या)

गेल्या पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या ‘चरणसेवा’ उपक्रमाचा समारोप शुक्रवार, दि. २४ जुलै रोजी होणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षामार्फत लोकसहभागातून हा उपक्रम राबविण्यात आला. यंदाच्या आषाढी वारीत राज्यातील १४ जिल्ह्यांतील ४ लाख ९६ हजारांहून अधिक वारकऱ्यांनी थेट चरणसेवा आणि आरोग्यसेवेचे लाभ घेतला.

आषाढी वारीदरम्यान वारकऱ्यांना होणारा शारीरिक ताण, स्नायूदुखी, पायांना येणारे फोड, थकवा तसेच पावसाळ्यातील संसर्गजन्य आजारांचा धोका लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला. मागील वर्षी सात जिल्ह्यांमध्ये सुरू झालेल्या या उपक्रमाचा यंदा विस्तार करून तो दिंडी मार्गावरील १४ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात आला.

या चौदा जिल्ह्यांत उपक्रम : सातारा, पुणे, सोलापूर, नाशिक, बुलढाणा, अकोला, जालना, बीड, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, वाशिम, सांगली, अमरावती आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांतील १४० मुक्कामस्थळांवर सेवा केंद्रे उभारण्यात आली. या केंद्रांमधून वारकऱ्यांना चरणसेवा, मोफत आरोग्य तपासणी, फिजिओथेरपी, प्रथमोपचार, आवश्यक औषधांचे वितरण, रुग्णवाहिका सुविधा तसेच गरजेनुसार पुढील उपचारांची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली. या उपक्रमात १६४ आरोग्य संस्थांनी सहभाग घेतला. ७ हजार ५३८ स्वयंसेवक तसेच ११ हजार ३३१ डॉक्टर, वैद्यकीय प्रशिक्षणार्थी विद्यार्थी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी सेवाकार्यात



योगदान दिले. सेवेसाठी १० हजार टी-शर्ट आणि ३ हजार लिटर आयुर्वेदिक औषधी तेलाचा उपयोग चरणसेवेसाठी करण्यात आला. तसेच ८ रथांद्वारे जनजागृती करण्यात आली. लोकसहभागातून साकारण्यात आलेल्या या उपक्रमातून तब्बल ४ लाख ९६ हजारांहून अधिक वारकऱ्यांना प्रत्यक्ष चरणसेवा आणि आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात आली.

उपचारांबरोबरच आरोग्य जनजागृतीलाही विशेष महत्त्व देण्यात आले. आरोग्य जनजागृती रथांद्वारे स्वच्छता, सुरक्षित पिण्याचे पाणी, संसर्गजन्य आजारांपासून बचाव, रक्तदान, अवयवदान संदर्भात जनजागृती, निरोगी जीवनशैली तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती वारकऱ्यांपर्यंत आरोग्य रथाच्या माध्यमातून पोहोचविण्यात आली

राज्यातील १४ जिल्ह्यांमध्ये ४ लाख ९६ हजारांपेक्षा अधिक वारकऱ्यांपर्यंत ‘चरणसेवा’ पोहोचविता आली, याचा आनंद आहे. या उपक्रमाच्या यशामागे लोकसहभाग हीच सर्वात मोठी ताकद ठरली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेला विविध आरोग्य संस्था, दानशूर व्यक्ती, डॉक्टर, वैद्यकीय प्रशिक्षणार्थी विद्यार्थी, आरोग्य कर्मचारी आणि हजारो स्वयंसेवकांनी दिलेल्या मोलाच्या सहकार्यामुळे हे सेवाकार्य यशस्वी झाले.

**- रामेश्वर नाईक कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष**

## थोडक्यात पण महत्वाचे



### ‘समग्र शिक्षा’च्या निधीत वाढ करण्यात यावी

मुंबई (दैनिक संध्या) : देशातील एकूण विद्यार्थी संख्येपैकी तब्बल ८.६१ टक्के विद्यार्थी एकट्या महाराष्ट्रात शिक्षण घेत असताना, केंद्राच्या ‘समग्र शिक्षा’ अर्थसंकल्पात राज्याच्या वाट्याला अवघा ३.०६ टक्के निधी येतो. याकडे लक्ष वेधत शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी केंद्रपुरस्कृत योजनांच्या आढाव्यासाठी आयोजित राज्य व केंद्रशासित प्रदेशांच्या शिक्षणमंत्र्यांच्या दोन दिवसीय परिषदेत महाराष्ट्रासाठी भरीव निधी वाढीची मागणी केली. या परिषदेत शालेय शिक्षण मंत्री भुसे म्हणाले, २०२५-२६ मध्ये देशाचा एकूण ‘समग्र शिक्षा’ अर्थसंकल्प ८७,३६७ कोटी रुपये होता. त्यापैकी महाराष्ट्राच्या वाट्याला २,६७३ कोटी रुपये आले आहेत. राज्यात एक लाखांहून अधिक शाळा, ७.५ लाखांहून अधिक शिक्षक आणि २.१० कोटींहून अधिक विद्यार्थी असून, मुंबई-पुण्यासारख्या शहरी भागांपासून गडचिरोली-नंदुरबारसारख्या दुर्गम व आदिवासी भागांपर्यंत पसरलेल्या या अत्यंत वैविध्यपूर्ण भौगोलिक रचनेचा विचार निधी वाटपात व्हावा, अशी भूमिका त्यांनी मांडली. राज्याच्या ८८ हजार कोटींच्या शिक्षण अर्थसंकल्पापैकी सुमारे ९४ टक्के रक्कम शिक्षकांचे वेतन व निवृत्तीवेतनावर खर्च होते. त्यामुळे पायाभूत सुविधांसाठी केंद्राच्या भक्कम पाठबळाची निकड असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.



### बाळ गंगाधर टिळक यांना जयंतीनिमित्त अभिवादन

मुंबई (दैनिक संध्या) : भारतीय असंतोषाचे जनक आणि ‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच’ अशी गर्जना करून देशवासियांमध्ये राष्ट्रप्रेमाची ज्वाला पेटवणारे थोर स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त आज मंत्रालयात सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव डॉ. अतुल पाटणे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. सामन्य प्रशासन विभागाचे अवर सचिव रामदास कोळेकर, कक्ष अधिकारी निलेश हरड, संदेश उतेकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहाय्यक कक्ष अधिकारी विजय शिंदे, अमोल चव्हाण यांनीही लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी मंत्रालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### राज्यपालांचे लोकमान्य टिळक यांना अभिवादन

मुंबई (दैनिक संध्या) : लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या १७० व्या जयंती निमित्त राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी गुरुवारी (दि. २३) लोकभवन, मुंबई येथे लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले. राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, सहसचिव एस. राममूर्ती, परिवार प्रबंधक डॉ. निशिकांत देशपांडे त्याचबरोबर लोकभवनातील अधिकारी, कर्मचारी; तसेच पोलीस अधिकारी उपस्थित होते.

### व्यापक कृती आराखडा तयार करा : मंत्री शेलार

मुंबई (दैनिक संध्या) : राज्य शासनाने गणेशोत्सवाला ‘राज्य महोत्सव’ म्हणून घोषित केल्यानंतर यंदाच्या वर्षी हा उत्सव अधिक व्यापक, सुबद्ध आणि लोकसहभागातून साजरा करण्यासाठी सर्व शासकीय विभागांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करावा. त्यासाठी विभागनिहाय जबाबदाऱ्या निश्चित करून कृती आराखडा तयार करावा तसेच यासंदर्भातील शासन निर्णय (जीआर) तातडीने तयार करावा, असे निर्देश सांस्कृतिक कार्य मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची सोमेश्वर कारखान्यास भेट

सोमेश्वरनगर (दैनिक संध्या) : श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाची बैठक संपन्न झाली. बैठकीत कारखान्याच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेत विविध विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली. यावेळी आदरणीय स्व.दादांच्या स्मरणार्थ वृक्षारोपण करून 'अजितवृक्ष' असे नामकरण करण्यात आलेल्या त्यांच्या अतिप्रिय सोनचाफ्याच्या वृक्षाला विनम्र अभिवादन केले.




### उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते स्वच्छता अभियानाचा शुभारंभ

■ दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त विशेष उपक्रम

बारामती (दैनिक संध्या) : दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते बारामती एमआयडीसी परिसरात स्वच्छता अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष सचिन सातव, उप विभागीय अधिकारी उत्तम दिघे, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील, उप विभागीय पोलीस अधिकारी चैतन्य कदम, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल पवार, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम, तहसीलदार स्वप्नील रावडे, कार्यकारी अभियंता विजय पेटकर यांच्यासह विविध उद्योगांचे प्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक उपस्थित होते. श्रीमती पवार म्हणाल्या, समाजहिताच्या उपक्रमांमधून दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्याला अभिवादन करण्याचा हा एक अर्थपूर्ण प्रयत्न असून स्वच्छ व सुंदर बारामती घडविण्यासाठी प्रत्येकाने सक्रिय सहभाग घेऊन स्वच्छतेची सवय अंगीकारावी, असे आवाहन श्रीमती पवार यांनी केले. श्री. पाटील म्हणाले, बारामती एमआयडीसी परिसर स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक ठेवण्यासाठी उद्योग, कर्मचारी आणि नागरिकांच्या संयुक्त सहभागातून नियमित स्वच्छता उपक्रम राबविण्यात येणार आहेत. उद्योग क्षेत्रात स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण करून पर्यावरण संवर्धनाला चालना देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश असल्याचे ते म्हणाले.

### माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त वृक्षारोपण

नारायणगाव (दैनिक संध्या) : महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून डुंबरवाडी येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामस्थांनी अजितदादा पवार यांच्या पवित्र स्मृतीस सामूहिक अभिवादन केले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत ग्रामस्थांनी उस्फूर्तपणे या उपक्रमात सहभाग नोंदवला. कार्यक्रमाची सुरुवात स्व.अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आणि सामूहिक अभिवादन करून झाली. याप्रसंगी गावामध्ये पर्यावरण संवर्धनाचा आणि सुरक्षेचा संदेश देण्यात आला. ग्रामस्थांनी एकत्र येत 'एक व्यक्ती, एक वृक्ष' हा महत्त्वाचा संदेश दिला. तसेच भावी पिढीसाठी हरित आणि निरोगी वातावरण निर्माण करण्याचा निर्धार व्यक्त केला. या मोहिमेत ओतूर, रोहोकडी, खामुंडी, धोलवड, ठिकेकरवाडी, हिवरे खुर्द आणि आंबेगव्हाण यांसह विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणावर झाडे लावण्यात आली. पर्यावरणाचे रक्षण करणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. यावेळी डुंबरवाडीच्या सरपंच शीतल गोरे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायत सदस्य बन्सी हाडवळे, प्रकाश डुंबरे ,प्रशांत आरोटे, प्रदीप डुंबरे,नीता डुंबरे, अनिकेत डुंबरे, राजेश हाडवळे, नारायण डुंबरे,प्रियंका डुंबरे,संगीता डुंबरे, भिमाजी गोरे, मारुती आरोटे यांच्यासह गावातील अनेक आजी-माजी पदाधिकारी, सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी या पर्यावरणपूरक मोहिमेत उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

## जुन्नर तालुक्यातील नगदवाडी शाळेत विद्यार्थ्यांना स्कूलबॅग व वह्यांचे वाटप



नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्याचे माजी आमदार अतुलशेठ बेनके यांच्या वाढदिवसानिमित्त नगदवाडी ता.जुन्नर,जि.पुणे येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळेतील इ.1ली ते 7 वी मधील निराधार,गरीब,गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या 70 विद्यार्थ्यांना स्कूलबॅग व इ. 1 ली ते 10 वी मधील 300 विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आल्याची माहिती केंद्रशाळेच्या मुख्याध्यापिका उज्वला बोऱ्हाडे यांनी दिली. या कार्यक्रमासाठी BKT व बांगा टायर्स नारायणगावचे के.एस.बांगा तसेच कांदळी गावचे शिक्षणप्रेमी माजी आदर्श सरपंच बाळासाहेब शिवाजीराव बढे यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या निमित्ताने जुन्नर तालुक्याचे माजी आमदार अतुलशेठ बेनके,रोटरी क्लब नारायणगावचे अध्यक्ष व युवा नेते अमितशेठ बेनके,BKT व बांगा टायर्सचे के.एस.बांगा, अनिल मालाणी,नगदवाडी केंद्राच्या केंद्रप्रमुख वनिता हांडे,न्यू इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक डॉ.दिपक घाडगे,ग्रामपंचायत सदस्य निलेश बढे,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिनेश बढे,विकास बढे,संकेत बढे,सुधीर फुलवडे,अभिजित बढे,नवनाथ नेंद्रे,पुष्कर ब्रह्मे आदी मान्यवर उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांवरील लाठीमाराच्या निषेधार्थ नीरा येथे संताप

नीरा (दै. संध्या)

देशातील विविध स्पर्धा परीक्षा व भरती प्रक्रियेतील कथित पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाला नीरा येथील विविध सामाजिक संघटनांनी जाहीर पाठिंबा दर्शविला. तसेच आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीमाराचा तीव्र शब्दांत निषेध नोंदविण्यात आला.

या पार्श्वभूमीवर गुरुवारी नीरा ग्रामपंचायत कार्यालयासमोरील छत्रपती शिवाजी महाराज चौकात ग्रामस्थ, विद्यार्थी आणि पालकांच्या उपस्थितीत निषेध सभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी केंद्र सरकारच्या भूमिकेवर टीका करत संबंधित घटनेची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.




### केंद्र सरकारच्या भूमिकेवर टीका

सभेत वक्त्यांनी सांगितले की, लोकशाही व्यवस्थेत शांततापूर्ण आंदोलन करणे हा प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार आहे. आपल्या न्याय्य मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर बळाचा वापर करणे ही लोकशाहीला काळिमा फासणारी बाब असून विद्यार्थ्यांचा आवाज दडपण्यासाठी लाठीमाराचा मार्ग स्वीकारणे कोणत्याही लोकशाही सरकारला शोभणारे नसल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

तसेच देशाच्या भवितव्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याऐवजी दडपशाहीचा मार्ग अवलंबला जात असेल, तर ती चिंतेची बाब असल्याचे नीराचे उपसरपंच राजेश काकडे यांनी नमूद केले. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी सरकारने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी मागणीही करण्यात आली.

यावेळी विद्यार्थी आणि आंदोलकांनी हातात निषेधाचे फलक घेऊन घोषणाबाजी केली. "लोकशाहीचा हक्क आमचा अधिकार", "विद्यार्थ्यांवरील अन्याय बंद करा" आणि "लाठीमाराचा निषेध असो" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. सभेनंतर विद्यार्थ्यांनी जेजुरी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सर्जेराव पुजारी यांच्याकडे निवेदन सादर केले.

या निषेध सभेला नीरेचे उपसरपंच राजेश काकडे, सदस्य संदीप धायगुडे, अनिल चव्हाण, अभिषेक भालेराव, सुनील चव्हाण, अनंता शिंदे, ॲड. आदेश गिरमे, दादा गायकवाड, डॉ. श्रीणीक शहा, सचिन मोरे, मंगेश ढमाळ, राजेंद्र बरकडे, शांतिकुमार कोठडीया, सुरेश वीर, महेश जेधे, दयानंद चव्हाण, अकबर सय्यद, सिकंदर शेख, शशिकांत जगदाळे, भगवान गोफणे, अजित सोनवणे, आदिराज कोठडीया, स्वप्निल कांबळे, अमोल घुले, प्रसाद सोनवणे, विद्यार्थी पवन बिचकुले आणि सक्षम मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. सभेला मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## मोक्का कायद्यांतर्गत कारवाईची भैरव क्रांती सेनेची मागणी

पुणे (दै. संध्या)

दिनांक २० जुलै २०२६ रोजी पुणे शहरातील कात्रज परिसरात भटक्या विमुक्त जाती-जमातीतील नाथपंथी डवरी गोसावी समाजातील अल्पवयीन युवक कै. कु. गणेश माळवे यांची सात आरोपींनी अत्यंत क्रूरपणे हत्या केल्याची घटना घडली. या अमानुष घटनेचा भैरव क्रांती सेनेच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला आहे.




या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर समाजबांधव, पीडित कुटुंबीय व भैरव क्रांती सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्रितपणे भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मा. मानसिंगराव पाटील तसेच या गुन्ह्याचे तपास अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक मा. गणेश मोहेते यांची प्रत्यक्ष भेट घेतली. यावेळी पीडित कुटुंबीयांच्या वतीने आणि भैरव क्रांती सेनेच्या वतीने या गुन्ह्यातील उर्वरित आरोपींना तातडीने अटक करून सर्व आरोपींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, तसेच या गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) लागू करण्याची ठाम मागणी करण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक व तपास अधिकाऱ्यांनी आतापर्यंत करण्यात आलेल्या तपासाची व कारवाईची माहिती प्रतिनिधींना दिली तसेच उर्वरित आरोपींना लवकरात लवकर अटक करून निष्पक्ष व प्रभावी तपास करण्यात येईल, अशी ग्वाही दिली. भैरव क्रांती सेनेने या प्रकरणात पीडित कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत पाठपुरावा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला असून, दोषींवर कठोरात कठोर कारवाई करून त्यांना कायद्यानुसार शिक्षा व्हावी, अशी मागणी पुन्हा एकदा शासन व पोलीस प्रशासनाकडे केली आहे.

## माळशेज भागात भात लावणीला वेग, मात्र खतटंचाईमुळे शेतकरी चिंतेत

नारायणगाव (दै. संध्या)

गेल्या काही दिवसांपासून जुन्नर तालुक्यातील माळशेज घाट परिसरात कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे भात लागवडीची कामे खोळंबली होती. मात्र, आता पावसाने काहीशी विश्रांती घेतल्याने साचलेले पाणी ओसरले आहे. जमिनीतील योग्य ओलावा बघून शेतकऱ्यांनी पुन्हा एकदा उत्साहाने भात लावणीच्या कामाला सुरुवात केली आहे. अतिवृष्टीमुळे अनेक शेतांमध्ये पाणी साचल्याने रोपलावणीची कामे ठप्प झाली होती. काही ठिकाणी पाण्याचा निचरा न झाल्याने रोपे खराब होण्याची शक्यता निर्माण झाली होती, तर काही शेतकऱ्यांपुढे दुबार पेरणीचे संकट उभे राहण्याची भीती होती. मात्र, गेल्या काही दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतल्याने परिस्थितीत सकारात्मक बदल झाला आहे.

सांगनोरे, कोल्हेवाडी, खिरेश्वर, मढ, पारगाव आणि तळेरान या गावांमधील शिवारे सध्या भात लावणीच्या लगबगीने गजबजून गेली आहेत.पारंपरिक पद्धतीने ओल्या शेतात गाणी गात महिला आणि पुरुष शेतकरी एकत्र येऊन भात रोपांची लावणी करत आहेत. बहुतांश शेतकऱ्यांनी आधीच रोपे तयार ठेवली असल्याने, पुढील १५ ते २० दिवसांत परिसरातील भात लागवड पूर्ण होईल असा अंदाज वर्तवला जात आहे.यंदा पाऊस समाधानकारक असल्याने चांगल्या उत्पादनाची आशा आहे. एकीकडे निसर्गाने साथ दिली असली तरी दुसरीकडे शेतकरी मानवनिर्मित अडचणींमुळे त्रस्त झाला आहे.

## जन्म-मृत्यू दाखल्यातील पूर्ण नाव बदलाला मज्जाव

पुणे (दै. संध्या)

जन्म किंवा मृत्यू दाखल्यात पूर्णपणे नाव बदलता येणार नाही. त्यात केवळ काना, वेलांटी, मात्रा, तसेच स्पेलिंग दुरूस्ती करता येणे शक्य आहे. नाव बदलायचे असेल तर जुने नाव कायम ठेवून ऊर्फ लिहून दुसरे नाव टाकता येईल. नावात बदल करण्याचे काम हे केंद्र शासनाच्या सीआरएस प्रणालीतून होत असून, महापालिकेला यात अधिकार नाहीत, असा खुलासा स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी केला आहे. गेल्या आठवड्यात स्थायी समितीमध्ये उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या आधारे पुणे महापालिकेत जन्म व मृत्यू दाखल्यात बदल करणे शक्य आहे. या पद्धतीनुसार काम करावे असे आदेश देण्यात आले होते. पण हे आदेश स्थायी समितीने दिल्यानंतर प्रशासन स्तरावर गोंधळ निर्माण झाला होता. क्षेत्रीय कार्यालय व जन्म मृत्यू कार्यालयात नागरिक व अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये वाद निर्माण झाला होता. त्यामुळे आज स्थायी समितीच्या बैठकीत पुन्हा एकदा यावर चर्चा झाली.

## ज्येष्ठ नागरिकांसाठी कृत्रिम अवयव, कॅलिपर व सपोर्टिव्ह स्टिक वाटप उपक्रम

पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या 56 व्या वाढदिवसानिमित्त समाजातील दिव्यांग बांधव, ज्येष्ठ नागरिक तसेच चालण्यास अडचण असलेल्या रुग्णांना मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने विशेष सेवा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत पुण्याच्या महापौर मा. मंजुषाताई नागपुरे यांच्या हस्ते 560 दिव्यांग लाभार्थ्यांना कृत्रिम हात, कृत्रिम पाय, कॅलिपर तसेच ज्येष्ठ नागरिक व पायांच्या आजारामुळे चालण्यास अडचण असलेल्या रुग्णांना सपोर्टिव्ह स्टिक (काठ्या) यांचे मोफत वाटप करण्यात येणार आहे. या प्रसंगी




महापौर मा. मंजुषाताई नागपुरे म्हणाल्या, “मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त समाजातील गरजू, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे. समाजातील प्रत्येक घटकाला सक्षम, स्वावलंबी व सन्मानाने जगता यावे, हीच या उपक्रमामागील भावना आहे.”

या उपक्रमामुळे अनेक दिव्यांग व्यक्तींना दैनंदिन जीवन अधिक सुलभ होण्यास मदत होणार असून, ज्येष्ठ नागरिकांनाही सुरक्षितपणे चालण्यासाठी आवश्यक आधार उपलब्ध होणार आहे. सामाजिक बांधिलकी जपत गरजू नागरिकांच्या सेवेसाठी अशा उपक्रमांचे आयोजन सातत्याने करण्यात येईल, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

या कार्यक्रमास विविध मान्यवर, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, वैद्यकीय तज्ज्ञ, नागरिक तसेच मोठ्या संख्येने लाभार्थी उपस्थित राहणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित हा उपक्रम सामाजिक संवेदनशीलतेचा आणि जनसेवेचा एक प्रेरणादायी उपक्रम ठरणार आहे.

## ओएसिस फर्टिलिटीतर्फे पुण्यात ‘जननी डायलॉग्स’चे आयोजन

### प्रजनन आरोग्याबाबत जनजागृतीसह ‘ओएसिस अकॅडमी’ची घोषणा

पुणे (दै. संध्या)

भारतात बदलती जीवनशैली, करिअरला दिले जाणारे प्राधान्य, आर्थिक नियोजन आणि वाढत्या वयामुळे कुटुंब नियोजनाचे निर्णय अधिक गुंतागुंतीचे होत आहेत. या पार्श्वभूमीवर ओएसिस फर्टिलिटीतर्फे पुण्यात ‘जननी डायलॉग्स’ या सार्वजनिक हिताच्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. "द पॅरेंटहुड पॅराडॉक्स : बिल्डिंग अ फॅमिली-फ्रेंडली इंडिया" या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमात प्रजनन आरोग्य, पालकत्वाविषयी जागरूकता आणि माहितीपूर्ण कुटुंब नियोजन यावर विविध क्षेत्रातील तज्ज्ञांनी सखोल चर्चा केली. या कार्यक्रमात वैद्यकीय तज्ज्ञ, स्त्रीरोगतज्ज्ञ, मानसोपचार तज्ज्ञ, मानव संसाधन क्षेत्रातील प्रतिनिधी, सामाजिक संस्था तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले. हैदराबाद येथून आयोजित राष्ट्रीय चर्चेचे थेट प्रक्षेपण पुण्यासह देशातील विविध शहरांमध्ये करण्यात आले. चर्चेदरम्यान भारतातील एकूण प्रजनन दर हा पुर्नस्थापना पातळीपेक्षा खाली आल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली. विवाह उशिरा होणे हेच एकमेव कारण नसून, शिक्षण, करिअर, आर्थिक स्थैर्य आणि वैयक्तिक ध्येयांना प्राधान्य देत अनेक जोडपी पालकत्व पुढे ढकलत असल्याचे तज्ज्ञांनी नमूद केले. मात्र, मानवी प्रजननक्षमतेचे जैविक घड्याळ आपल्या नैसर्गिक गतीनेच चालत असल्याने योग्य वेळी प्रजनन आरोग्याविषयी जागरूकता आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा अत्यंत महत्त्वाची असल्याचे अधोरेखित करण्यात आले.

कार्यक्रमात ‘पॅरेंटहुड पॅराडॉक्स’ या संकल्पनेवर विशेष भर देण्यात आला. बदलती जीवनशैली आणि अपरिवर्तित जैविक वास्तव यातील वाढत्या अंतरामुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांवर चर्चा करण्यात आली. कोणाच्याही वैयक्तिक निर्णयावर प्रभाव टाकणे हा या उपक्रमाचा उद्देश नसून, योग्य माहिती आणि वेळेवर मार्गदर्शनाद्वारे सुजाण निर्णय घेण्यास मदत करणे हेच या कार्यक्रमाचे ध्येय असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

यावेळी पालकत्वाच्या आर्थिक पैलूंवरही चर्चा झाली. कुटुंब नियोजन ही केवळ वैयक्तिक जबाबदारी नसून शासन, नियोक्ते, आरोग्य संस्था आणि समाज यांनीही सकारात्मक भूमिका बजावण्याची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. तसेच, वडिलांचा सक्रिय सहभाग, कार्यस्थळावरील अनुकूल धोरणे आणि समाजाचा पाठिंबा यावरही भर देण्यात आला. याच कार्यक्रमात ‘ओएसिस अकॅडमी’ या प्रजनन आरोग्य आणि वंध्यत्व उपचार क्षेत्रातील शिक्षण व प्रशिक्षण उपक्रमाचीही घोषणा करण्यात आली. संशोधन, वैज्ञानिक प्रकाशने, स्त्रीरोगतज्ज्ञ आणि वैद्यकीय व्यावसायिकांसोबत




ज्ञानाची देवाणघेवाण तसेच भविष्यातील तज्ज्ञ डॉक्टर आणि एम्ब्रायोलॉजिस्ट तयार करण्यासाठी ही अकॅडमी कार्य करणार आहे. अलीकडेच ईएसएचआरई २०२६ या आंतरराष्ट्रीय परिषदेत ओएसिस फर्टिलिटीने २९ वैज्ञानिक संशोधन सादरीकरणे केली असून, आजपर्यंत २५० हून अधिक डॉक्टर आणि २०० एम्ब्रायोलॉजिस्टना प्रशिक्षण दिले आहे. विशेषतः टियर-२ आणि टियर-३ शहरांमध्ये प्रशिक्षित तज्ज्ञांची संख्या वाढविण्याचा अकॅडमीचा संकल्प आहे. डॉ. निलेश उन्मेष बलकवडे , रिजनल मेडिकल हेड, ओएसिस फर्टिलिटी, म्हणाले, "प्रजनन आरोग्याबाबत योग्य वेळी जागरूकता निर्माण करणे आणि माहितीपूर्ण निर्णय घेणे आज अत्यंत गरजेचे आहे. त्याचबरोबर गुणवत्तापूर्ण उपचार अधिकाधिक जोडप्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशिक्षित तज्ज्ञांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. ‘ओएसिस अकॅडमी’द्वारे आम्ही या दिशेने सातत्याने कार्य करत राहू." ओएसिस फर्टिलिटीने स्पष्ट केले की ‘जननी डायलॉग्स’ हा कोणत्याही आयव्हीएफ उपचाराचा प्रचार नसून सार्वजनिक हिताचा जनजागृती उपक्रम आहे. या माध्यमातून कोणत्याही विशिष्ट उपचारपद्धतीचा प्रचार केला जात नाही किंवा प्रत्येकाने पालकत्व स्वीकारावे असा संदेश दिला जात नाही. उलट, कुटुंब निर्माण करण्याच्या प्रवासात सामाजिक, आर्थिक, वैद्यकीय आणि कार्यस्थळाशी संबंधित अडथळ्यांवर चर्चा करून त्यावरील उपाय शोधण्याचा हा प्रयत्न आहे.

## टोलच्या वादात प्रवाशी वेठीस

### हडपसर–जेजुरी–नीरा पीएमपीएल सेवा दिवसभर ठप्प!

नीरा (दै. संध्या)

■ पूर्वसूचना नाही, पर्यायी व्यवस्था नाही; पीएमपीएलच्या बेजबाबदार कारभारावर प्रवाशांचा संताप

बेलसर टोलनाका व्यवस्थापन आणि पीएमपीएल प्रशासन यांच्यात टोल शुल्काच्या आर्थिक वादाचा फटका अखेर सर्वसामान्य प्रवाशांना बसला. हडपसर–जेजुरी–नीरा मार्गावरील पीएमपीएलच्या बसफेऱ्या गुरुवारी दिवसभर अचानक बंद ठेवण्यात आल्याने हजारो नियमित प्रवाशांचे अक्षरशः हाल झाले. कोणतीही पूर्वसूचना न देता सेवा बंद करण्यात आल्यामुळे पीएमपीएलच्या नियोजनशून्य आणि बेजबाबदार कारभाराविरोधात प्रवाशांनी तीव्र संताप व्यक्त केला.

पुणे–पंढरपूर पालखी महामार्गाच्या रुंदीकरणानंतर जेजुरीजवळ बेलसर येथे उभारण्यात आलेल्या टोलनाक्यावर गेल्या दोन महिन्यांपासून टोल वसुली सुरू आहे. या मार्गावर धावणाऱ्या पीएमपीएल बसांना अल्प अंतरासाठीही मोठ्या प्रमाणात टोल भरावा लागत असल्याने हा आर्थिक भार असह्य ठरत असल्याचे सांगण्यात येत आहे. यापूर्वी टोल व्यवस्थापन आणि पीएमपीएल प्रशासन यांच्यात चर्चा होऊन सवलतीच्या दरात बस सोडण्याचा तात्पुरता तोडगा काढण्यात आला होता. त्यासाठी पीएमपीएलने प्रवाशांच्या तिकिटामागे एक रुपया अतिरिक्त आकारण्यासही सुरुवात केली होती. मात्र, गुरुवारी पुन्हा टोल शुल्काच्या आर्थिक बोलणीत तिढा निर्माण झाल्याने संबंधित व्यवस्थापनाने बससेवा रोखल्याचे समोर आले. या वादात प्रवाशांचा काहीही संबंध नसताना त्यांनाच वेठीस धरल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. हडपसर, सासवड, जेजुरी, वाल्हे, नीरा या मार्गावरील विद्यार्थी, नोकरदार, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि व्यावसायिक यांना पर्यायी वाहतुकीचा आधार घ्यावा लागला. अनेकांना खासगी वाहनांचा खर्च सोसावा लागला, तर काहींची महत्त्वाची कामेही खोळंबली. विशेष म्हणजे, बससेवा बंद राहणार असल्याची साधी पूर्वसूचनाही पीएमपीएलने दिली नाही. त्यामुळे बसस्थानकांवर तासन्तास प्रतीक्षा करणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. सार्वजनिक वाहतूक सेवा देणाऱ्या संस्थेकडून अशा प्रकारची निष्काळजी भूमिका अपेक्षित नसल्याची प्रतिक्रिया प्रवाशांनी व्यक्त केली.

टोलच्या वादावर तातडीने तोडगा काढण्याऐवजी बससेवा बंद ठेवण्याचा निर्णय म्हणजे सर्वसामान्य नागरिकांवर अन्याय असल्याची भावना व्यक्त होत आहे. टोलचा प्रश्न प्रशासनाने चर्चेतून सोडवावा; मात्र त्यासाठी प्रवाशांना वेठीस धरणे थांबवावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. पीएमपीएल प्रशासनाने या प्रकाराबाबत स्पष्टीकरण देऊन भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा प्रवाशांकडून व्यक्त होत आहे.